**सुविचार**
मन में भय का अर्थ है कि मैं स्वयं के लिए व दूसरों के लिए एक खतरा हूँ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शनिवार दि. २५ मे २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१८८ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


## १९७१ मध्ये पंतप्रधान असतो तर कर्तारपूर साहेब भारतात असते

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा दावा

पटीयाला - लोकसभा निवडणुकीचे दोन टप्पे बाकी आहेत एक २५ मे रोजी होणार आहे तर सातवा टप्पा १ जून रोजी पार पडणार आहे. या दोन्ही टप्प्यांचा प्रचार सुरु आहे. पटियाला या ठिकाणी पार पडलेल्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कर्तारपूरबाबत महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. पटियाला या ठिकाणी जे भाषण पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलं त्यात कर्तारपूर बाबत महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. एका रॅलीमध्ये ते बोलत होते.

मी जर १९७१ मध्ये भारत-पाकिस्तान युद्ध झालं त्यावेळी मी जर पंतप्रधान असतो तर आत्मसमर्पण करणाऱ्या ९० हजार पाकिस्तानी सैनिकांना सोडवले असते. तसेच पाकिस्तानकडून कर्तारपूर साहेब परत घेतले असते. असे नरेंद्र मोदींनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी करतारपूर साहेब गुरुद्वाऱ्याचा भावनात्मक मुद्दा उपस्थित केला. देशाच्या फाळणीसाठी काँग्रेस जबाबदार आहे असेहि पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटले आहे. देशाची फाळणी झाली तेव्हा करतारपूर साहेब पाकिस्तानमध्ये जो पंजाब प्रांत गेला त्यात गेला. करतारपूर साहेब गुरुद्वारा भारताच्या सीमेपासून काही किलोमीटर अंतरावर आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, ७० वर्षांपासून आपण करतारपूर साहेब गुरुद्वारा दुर्बिणीतून पाहतो होतो. १९७१ मध्ये हा गुरुद्वारा भारतात येऊ शकत होता. मी जर तेव्हा पंतप्रधान असतो तर ही गोष्ट घडवली असती. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, काँग्रेसने ही गोष्ट केली नाही. मात्र २०१९ मध्ये आमच्या सरकारने करतापूर साहेब या ठिकाणी जाण्याचा मार्ग खुला केला. त्यामुळे शिख बांधव या ठिकाणी जाऊ शकले. पटियालाचे भाजपाचे लोकसभेच्या उमेदवार आणि पंजाबचे माजी मुख्यमंत्री अमरिंदर सिंग यांच्या पत्नी परनीत कौर यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भाषण केले. त्यात हे वक्तव्य केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्या भाषणात पंजाब सरकारवरहि जोरदार टीका केली. पंजाबमध्ये ड्रग्ज माफिया आणि (पान ७ वर)

## विधानपरिषदेच्या ४ जागांसाठी निवडणुकांची घोषणा

### २६ जूनला मतदान: आयोगाकडून कार्यक्रम जाहीर

मुंबई: महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकांचा जल्लोष संपल्यानंतर आता विधानपरिषद निवडणुकांचा बिगुल वाजला आहे. लोकसभा निवडणुकांचा (ङ्खेझीरलहर एश्रशलींळेप) निकाल ४ जून रोजी लागणार आहे. त्यानंतर, विधानपरिषदेच्या निवडणुका होणार आहेत. विधानपरिषदेच्या ४ जागांसाठीच्या निवडणूक कार्यक्रमाची नव्याने घोषणा करण्यात आली आहे. दोन शिक्षक तर दोन पदवीधर मतदार संघासाठी ही निवडणूक होत आहे. मुंबई (र्चीलरळ) आणि कोकण पदवीधर मतदार संघ, तर नाशिक आणि मुंबई शिक्षक मतदार संघात ही निवडणूक होणार आहे. या निवडणुकांसाठी १० जून ही तारीख जाहीर करण्यात आली होती. मात्र, आता विधानपरिषद निवडणुकांची तारीख बदलण्यात आली



आहे. नव्या वेळापत्रकानुसार पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकांसाठी २६ जून रोजी मतदान होणार आहे.

राज्यातील लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिक्षक व पदवीधर मतदारसंघाची निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती. आता, या निवडणुकीसाठी नव्याने कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यामध्ये, २ पदवीधर आणि २ शिक्षक मतदारसंघांचा समावेश आहे. मुंबई पदवीधर मतदार संघातून संजय पोतनीस तर कोकण पदवीधर मतदार संघातून निरंजन डावखरे यांची मुदत ७ जुलै रोजी संपत आहे. तसेच, मुंबई शिक्षक मतदार संघातून कपिल पाटील आणि नाशिक शिक्षक मतदार संघातून किशोर दराडे यांचीही मुदत संपत आहे. त्यामुळे, येथील ४ जागांसाठी निवडणूक आयोगाकडून विधानपरिषद निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी संपल्यानंतर लगेचच चारही विधान परिषदेच्या जागांसाठी मतदान होणार होते. यापूर्वी मतदानाची तारीख १० जून निश्चित झाली होती. मात्र, आता नवीन कार्यक्रमानुसार ह्या निवडणुकात २६ जून रोजी होणार असून १ जुलै रोजी मतमोजणी होत आहे. (पान ७ वर)

## पोर्शे कार अपघातातील अल्पवयीन तरुणाला कृत्याच्या परिणामांची जाणीव

### पोलीस आयुक्तांची धक्कादायक माहिती

पुणे: पुण्याच्या कल्याणीनगरमध्ये शनिवारी रात्री उशिरा झालेल्या अपघातात अश्विनी कोस्टा आणि अनिश अवधिया यांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणातील मुख्य अल्पवयीन आरोपीला आता ५ जूनपर्यंत बाल सुधार गृहात पाठवण्यात आलं आहे तर त्याचे वडील विशाल अगरवाल यांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. याप्रकरणी आतापर्यंत काय काय कारवाई करण्यात आली आहे आणि पुणे पोलिसांच्या कारवाईची दिशा काय हे स्पष्ट करण्यासाठी पुण्याचे



पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी पत्रकार परिषद घेतली. यामध्ये त्यांनी अल्पवयीनवर प्रौढ म्हणून खटला चालवण्याची मागणी कोर्टात केली असल्याचं सांगितलं आहे. तसेच, त्याला कृत्याचे काय परिणाम होऊ शकतात हे त्याला माहिती होतं, असंही अमितेश कुमार यांनी सांगितलं.

पोर्शे कार अपघाताची घटना घडल्यावर प्राथमिक स्तरावर रविवारी (१९ मे) सकाळी ८ वाजता स्थानिक पोलिस ठाण्यात ३०४ (अ) चा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याच दिवशी घटनाक्रम कळाल्यावर ३०४ कलम लावण्यात आला जो अजामीनपात्र होता. त्याचदिवशी बाल हक्क मंडळात आरोपीवर प्रौढ म्हणून खटला चालवाला ही मागणी करण्यात आली होती. त्याचा निर्णय येतपर्यंत (पान ७ वर)

## शांतिगिरी महाराज करणार मोदींचा प्रचार

नाशिक : नाशिक लोकसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार शांतिगिरी महाराजांनी चांगलीच रंगत आणली. महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांना तगडे आव्हान शांतिगिरी महाराजांनी उभे केले.



यामुळे नाशिकमध्ये तिरंगी लढत पाहायला मिळाली. नाशिकमध्ये नक्की कोण बाजी मारणार हे चार जूनला स्पष्ट होणार आहे. आता शांतिगिरी महाराजांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींचा प्रचार करण्याचा निर्णय घेतला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी वाराणसी लोकसभा मतदारसंघातून निवडणुकीसाठी उभे आहेत. नाशिक लोकसभेची निवडणूक शांतिगिरी महाराजांनी अपक्ष लढवली. त्यानंतर शांतिगिरी महाराज पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रचारासाठी शनिवारी वाराणसीला रवाना होणार आहेत.

वाराणसीत आमचा भक्त परिवार आहे, असा दावा शांतिगिरी (पान ७ वर)



## लातूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार पक्षाची मासिक आढावा बैठक संपन्न

लातूर / प्रतिनिधी- लातूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार पक्षाची मासिक आढावा बैठक गुरुवार दि. २३ मे २०२४ रोजी जयक्रांती महाविद्यालय, लातूर येथे मोठ्या उत्साहात पार पडली.

आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष म्हणून श्री संजय शेटे, पक्षाचे प्रदेश सरचिटणीस मा.बसवराज पाटील नगराळकर, पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आ. शिवराज तोंडचिरकर, जिल्ह्याचे कार्याध्यक्ष रशिद भाई शेख, प्रदेश संघटक सचिव व चाकूर मार्केट कमिटी चे सभापती निळकंठ मिरकले, प्रदेश सचिव सोमेश्वर कदम व प्रा. माधव गंगापुरे, जिल्हाध्यक्ष भरत सुर्यवंशी, विद्यार्थी काँग्रेस चे जिल्हाध्यक्ष चेतन पाटील, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष इस्माईल लदाफ, राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे प्रदेश सचिव चंद्रशेखर कत्ते व महादेव आवळे, किसान आघाडीचे प्रदेश सरचिटणीस प्रल्हादराव सूर्यवंशी तसेच जिल्हा कमिटी च्या पदाधिकाऱ्यांसह तालुकाध्यक्ष, कार्याध्यक्ष, शहराध्यक्ष, कार्याध्यक्ष इ. मोठ्या संखेने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना लवकरच जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद मतदार संघात येउन कार्यकर्ता बैठक घेऊन पक्ष बांधणार असल्याचे सांगितले.



काशी ज्ञानपीठ पुरस्कार प्रा.ॲड. बी.व्ही.मोतीपवळे यांना काशीपीठ महास्वामिजी यांनी जाहीर केल्यामुळे केंद्रीय मंत्री श्री. भगवंत खुब्बा यांनी त्यांचा मुरुम येथे शाल श्रीफळ देवून सत्कार केला . याप्रसंगी माजी मंत्री श्री. बसवराज पाटील व उस्मानाबाद जिल्हा बॅंकेचे अध्यक्ष श्री. बापुराव पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

## ११, १२ वी मध्ये इंग्रजी अनिवार्य नाही

### राज्यात परकीय भाषा मानली जाणार

मुंबई : प्रतिनिधी- इंग्रजी भाषेचे परदेशी भाषा म्हणून वर्गीकरण केले जाईल. ज्युनियर कॉलेज स्तरावर (इयत्ता ११ आणि १२) यापुढे ती सक्तीची राहणार नाही. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने इयत्ता तिसरी ते १२ वीच्या शालेय शिक्षणासाठी काही शिफारशी मांडल्या यापैकी ही एक शिफारस आहे.

११,१२ वी साठी प्रस्तावीत विषय योजनेअंतर्गत विद्यार्थी आठ विषय निवडू शकतात. यामध्ये दोन भाषा, पर्यायांवर आणि शारीरिक शिक्षण आणि आवडीचे चार विषय असतात.

दरम्यान शिक्षणतज्ञ वसंत काळपांडे यांनी इंडियन एक्सप्रेससोबत बोलताना याला विरोध केला आहे. इंग्रजी भाषा विदेशी भाषा कशी असू शकते. राज्य आणि केंद्र सरकार यांच्यामध्ये संवाद, न्यायालयीन कामकाज आणि अनेक सरकारी कागदपत्रांमध्ये इंग्रजी भाषा वापरली जाते. हिंदीसह इंग्रजी ही भारत सरकारची अधिकृत भाषा म्हणून घोषित करण्यात आली आहे, असेही वसंत काळपांडे यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या मुसद्यात स्पष्टता नाही. प्रस्तावित विषयांच्या योजनेअंतर्गत, (पान ७ वर)

## विशाल अगरवालला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

अशोक सराफ, रोहिणी हट्टंगडी यांना नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर

मुंबई : मराठी नाट्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणा-या कलाकारांचा दरवर्षी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने गौरव केला जातो. यंदा १४ जून रोजी गो. ब. देवल पुरस्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी ज्येष्ठ सिने-नाट्य अभिनेते अशोक सराफ आणि अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

मागील तीन वर्षांपासून पुरस्कारांचे वितरण करण्यात आले नव्हते. नाट्य परिषदेची निवडणूक पार पडताच, कमी वेळात तातडीने नवनिर्वाचित नियामक मंडळाने जीवनगौरव पुरस्कार देण्याचे योजिले व पुरस्कार देण्यात आले. यंदाच्या वर्षी १४ जून २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल, मनमाला टँक रोड, मांटुगा-माहीम, मुंबई येथे सायंकाळी ४ वाजता सर्व पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती (पान ७ वर)



काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष,करवीर विधानसभा मतदारसंघातील आमदार पी. एन. पाटील यांचे नुकतेच अकस्मित निधन झाले,आज राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी कोल्हापुर येथे त्यांच्या निवासस्थानी जाऊन पाटील कुटुंबीयांची भेट घेतली, राजेश आणि राहुल पाटील व पाटील कुटुंबीयांचे सांत्वन केले,त्यांना धीर दिला.

## पाणी टंचाई उपाययोजनांचे प्रस्ताव तातडीने निकाली काढा

लातूर / प्रतिनिधी: पाणी टंचाई निवारण्यासाठी विहिरींचे अधिग्रहण, टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबतचे प्रस्ताव तीन दिवसांच्या आत निकाली काढण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व गट विकास अधिकारी यांना दिल्या. जिल्ह्यातील पाणी टंचाईचा आढावा घेण्यासाठी दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर. टी. जाधव, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल कांबळे यांच्यासह सर्व



उपविभागीय महसूल अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

पाणी टंचाई निवारण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या उपाययोजनांची गतिमान अंमलबजावणी होण्यासाठी उपविभागीय महसूल अधिकारी यांना विहिरींचे अधिग्रहण, टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याच्या प्रस्तावांना मंजुरी देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यामुळे गटविकास अधिकारी यांच्यामार्फत येणाऱ्या प्रस्तावांची पडताळणी करून हे प्रस्ताव तीन दिवसांत निकाली काढणे आवश्यक आहे. तसेच तहसीलदार, गट विकास अधिकारी यांनी क्षेत्रीय पाहणी करून नियमितपणे पाणी टंचाईचा आढावा घ्यावा. दर आठवड्याला प्रत्येक उपविभागीय महसूल अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पाणी टंचाई आणि त्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेवून त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाला सादर करावा, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

सिंचन प्रकल्पातील गाळ उपशासाठी ङ्गमिशन मोडफ्तर काम करावे

सध्या जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पातील पाणीसाठा कमी झाला असल्याने या प्रकल्पातील गाळ उपसा करण्यासाठी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मृद व जलसंधारण विभाग, लघु पाटबंधारे विभागाच्या समन्वयाने सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानात सक्रीय सहभाग नोंदवावा. उपविभागीय महसूल अधिकारी यांनी सातत्याने आढावा घेवून आवश्यक कार्यवाही करावी. येत्या आठवड्यात प्रत्येक उपविभागीय अधिकारी यांनी व्यापक स्वरुपात ही मोहीम (पान ७ वर)

## रितेश देशमुख, जेनेलिया देशमुख यांच्या हस्ते आज पारितोषिक वितरण सोहळा

लातूर प्रतिनिधी : लातूर जिल्हा व परिसरात गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप : ग्रामीण- टी १० चा पारितोषिक वितरण सोहळा सिनेअभिनेते रितेश देशमुख, प्रसिद्ध अभिनेत्री जेनेलिया देशमुख यांच्या हस्ते आज (दि.२५) जिल्हा क्रीडा संकुल येथे सायंकाळी पार पडणार आहे. त्यांच्या उपस्थितीतच स्पर्धेतील अंतिम सामना होणार आहे.

ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप : ग्रामीण- टी १० ही स्पर्धा सुरू करण्यात आली



असून या स्पर्धेचे यंदाचे तिसरे वर्ष आहे. शनिवारी (दि.१८) या स्पर्धेला सुरुवात झाली होती. लातूर शहर जिल्ह्यातील सर्व तालुके व लोहा-कंधार (जि. नांदेड) मधील सुमारे ३०० पेक्षा अधिक संघ सहभागी झाले होते.

लातूर तालुक्यातील ४२, लातूर शहर ३२, उदगीर ४१, अहमदपूर १५, चाकूर २२, देवणी २०, जळकोट १८, रेणापूर २३, शिरुर अनंतपाळ २६, औसा ३२, निलंगा १४ तर लोहा - कंधार तालुक्यातील १३ असे संघ व पाच हजारांपेक्षा अधिक खेळाडूंनी सहभागी झाले होते. तालुक्यात प्रथम आलेल्या १२ संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेत निवड झाली. या जिल्हास्तरीय स्पर्धा गेल्या दोन दिवसापासून जिल्हा क्रीडा संकुलाच्या मैदानावर सुरू आहेत. उपांत्य फेरीत रेणापूर विरुद्ध उदगीर आणि अहमदपूर विरुद्ध लातूर शहर यांच्यात लढत होऊन या स्पर्धेचा अंतिम सामना आज (दि.२५) सायंकाळी सात वाजता होणार आहे. यावेळी अभिनेते रितेश देशमुख व जेनेलिया देशमुख उपस्थित राहणार आहेत. या सामन्यास अधिकाधिक नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा



लातूर / प्रतिनिधी- बाराव्या शतकामध्ये संपूर्ण विश्वातील सर्वसामान्य लोकांमध्ये मानवतावादी विचार आपल्या कृतीशील विचारातून पेरणी करणारे जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या बसव वचनांची कास धरून आणि देशीकेंद्र महाराजांच्या मार्गदर्शनाने श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर या शैक्षणिक संस्थेची स्थापना सन १९६४मध्ये झाली. संपूर्ण मराठवाड्यातील गरजू, गरीब, होतकरू, गुणवंत आणि गुणवान विद्यार्थ्यांना शिक्षणाची सेवा पोहोचविण्याचा अविरत प्रयत्न संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या एकूण १६ विविध युनिटद्वारे केला जातो.

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर न्यासाच्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे श्री. सं. क. कुलकर्णी (धर्मदाय सहआयुक्त, छत्रपती संभाजी नगर) यांच्या नियंत्रणाखाली दि. ०२/०५/२०२४ रोजी संस्थेच्या कार्यालयात संस्थेची निवडणूक संपन्न झाली. यामध्ये संस्था पदाधिकाऱ्यांची निवड झाली त्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा लिंगायत शरण फाउंडेशन (महाराष्ट्र)च्यावतीने रविवार दि. २६ मे २०२४ रोजी सायं. ५.३० वा. भालचंद्र ब्लड बँक सभागृह, गांधी मार्केट, लातूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर हे उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून लातूर शहर महानगरपालिका, लातूरचे माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार आणि भाजप नेत्या डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या सत्कार सोहळ्यात संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ बसवंतराव सांगवे, उपाध्यक्ष माधवराव त्रिबंकराव पाटील (तपसेचिंचोलीकर), सचिव माधवराव हणमंतराव पाटील (टाकळीकर), सहसचिव सुनील सिद्रामप्पा मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार नागनाथप्पा रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप विश्वनाथप्पा दिंडीगावे, संचालक राजेश्वर वैजनाथराव बुके, संचालक बस्वराज (राजू) गुरुपादप्पा येरटे, संचालक काशिनाथ गुणवंतप्पा साखरे, संचालिका ललिता हावगीराव पांढरे, संचालक राजेश्वर नानासाहेब पाटील, संचालक बाबुराव विठ्ठलराव तरगुडे, संचालक प्रभूप्पा शिवलिंगप्पा पटणे, संचालक गुरुलिंग मल्लिकार्जुनप्पा धाराशिवे आणि संचालक महेश वीरभद्रप्पा हालगे आदि पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार संपन्न होणार आहे.

या सत्कार सोहळ्याला श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या युनिट मधील सर्व प्रमुख प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, लिंगायत शरण फाउंडेशन (महाराष्ट्र)चे सर्व पदाधिकारी आणि लातूर जिल्ह्यातील सर्व बसव बंधू-भगिनींनी उपस्थित राहण्याचे आवाहन लिंगायत शरण फाउंडेशन (महाराष्ट्र)च्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



# भक्ती स्थळावर पौर्णिमा उत्सव राष्ट्रसंतांच्या ५० वर्षाची परंपरेप्रमाणे २००० भक्तांना रस पोळी चा प्रसाद

अहमदपूर दि. २४(कारामुंगीकर) येथील राष्ट्रसंत डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या संजीवन समाधी येथे पौर्णिमा व पालखी उत्सव आनंदाने साजरा करण्यात आला.

यावेळी आलेल्या भक्तांना रस पोळी प्रसादाचे वाटप करण्यात आले राष्ट्रसंतांच्या संजीवन समाधी येथे प्रत्येक पौर्णिमेला पालखी उत्सव होत असतो यावर्षी वैशाख पौर्णिमेनिमित्त पालखी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते यात हजारो भक्तांनी सहभाग नोंदवल्या गुरुराज माऊली शिवलिंग माऊलीच्या गजरात पालखी सोहळा पार पडला राष्ट्रसंत नी ५० वर्षापासून चा रसाळीचा कार्यक्रमही पार पडला राष्ट्रसंतांनी त्यांच्या हाडोळती येथील गुरु बुद्धी स्वामी मठात असलेल्या आंब्याच्या झाडाचे आंबे विक्री न करता भक्तांना रस पोळीचां प्रसाद दर वैशाख पौर्णिमेला भक्तांना करण्यात येत असे हीच परंपरा आजही राष्ट्रसंतांचे उत्तर अधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज व त्यांचे अज्ञान पालन करते आचार्य गुरुराज स्वामी यांनी चालवली असून आजही हजारो भक्तांनी या रसाळीचा आस्वाद घेतला.

यावेळी भक्ती स्थळ विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष भगवंतराव पाटील चांभार्ग्रकर कोषाध्यक्ष सिद्धेश्वर मुन्ना पाटील उदगीरकर शिवप्रसाद कोरे मनमत आप्पा पालापुरे शिवलिंग पाटील किनीकर दत्ताभाऊ खकरे रतिकांत स्वामी तोंडारकर महादेव आप्पा लामतुरे पद्मिनी ताई खराडे शीलाताई शेटकर अरुणा बावचकर विठ्ठलराव गुडमे मनमत बिराजदार होनराव गुरुजी निळकंठ बिराजदार तसेच मंगनाळी व गंगाबेट गावकरी व भक्त मंडळाच्या वतीने प्रसादाचे वाटप करण्यात आले.

## इयत्ता बारावी पुरवणी परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज नियमित शुल्कासह ७ जूनपर्यंत स्वीकारले जाणार

लातूर, / प्रतिनिधी: उच्च माध्यमिक प्रमाणपत्र अर्थात इयत्ता बारावीच्या फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल २१ मे, २०२४ रोजी ऑनलाईन जाहीर झालेला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळातर्फे पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्ट, २०२४ मध्ये घेण्यात येणार आहे. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र बारावी परीक्षेस पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेतंर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे विद्यार्थी, आयटीआय विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संसथेद्वारे ट्रान्सफर ऑफ क्रिडेट घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

इयत्ता बारावी पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने www. mahahsscboard.in या संकेतस्थळावर स्वीकारण्यास २७ मे २०२४ पासून प्रारंभ होणार असून नियमित शुल्कासह ७ जूनपर्यंत अर्ज स्वीकारले जातील. विलंब शुल्कासह ८ जून, २०२४ ते १२ जून, २०२४ पर्यंत अर्ज स्वीकारले जातील. उच्च माध्यमिक शाळांनी, कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाची मुदत ३१ मे, २०२४ ते १५ जून, २०२४ पर्यंत आहे. तसेच उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यास याद्या जमा करावयाची तारीख १८ जून २०२४ पर्यंत राहील. परीक्षेचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यानी जुलै-ऑगस्ट, २०२४ मध्ये होणाऱ्या परीक्षेचे अर्ज त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयामार्फतच भरावेत. उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन अर्ज भरताना फेब्रुवारी-मार्च, २०२४ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यंना, त्यांची या परीक्षेतील माहिती अर्जात ऑनलाईन घेता येईल.

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नव्या तिकीट आरक्षण प्रणालीला प्रवाशांचा प्रतिसाद

लातूर, / प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने १ जानेवारी, २०२४ पासून बस तिकिटासाठी ऑनलाईन आरक्षण प्रणाली अद्ययावत केली आहे. या आरक्षण प्रणालीला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून १ जानेवारी ते २० मे,२०२४ पर्यंत राज्यातील १२ लाख ९२ हजार तिकिटांची ऑनलाईन विक्री झाली आहे. गतवर्षी याच कालावधीत ९ लाख ७५ हजार तिकीटांची विक्री झाली होती. यंदा सुमारे ३ लाख अधिक तिकिटांची विक्री झाली आहे. नवीन या ऑनलाईन आरक्षण प्रणालीद्वारे राज्यात दररोज अंदाजे १० हजार तिकीटे काढली जात आहेत.

प्रवाशांना घरबसल्या एसटीचे तिकीट उपलब्ध करुन देण्यासाठी एसटीने आपल्या npublic. msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन तिकिट आरक्षण करण्याची सोय केली आहे. तसेच भ्रमणध्वनीवर MSRTC Bus Reservation पच्या माध्यमातून देखील प्रवाशांना तिकीट काढता येते. या दोन्ही पध्दतीद्वारे तिकीट काढण्याच्या प्रणालीमध्ये १ जानेवारी, २०२४ पासून अमुलाग्र बदल करुन त्या अद्ययावत करण्यात आल्या. परिणामी त्यातील दोष दूर झाल्याने नवीन ऑनलाईन आरक्षण प्रणाली प्रवाशांना वापरण्यास अत्यंत सोपी व सुलभ झाली आहे. तसेच या दोन्ही प्रणालीद्वारे प्रवाशांना अमृत, जेष्ठ नागरिक, जेष्ठ नागरिक, महिला सन्मान योजना, दिव्यांग व्यक्ती अशा विविध सवलतीचे देखील आगाऊ आरक्षण मिळत आहे. त्यासाठी महामंडळाने npublic. msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळाबरोबर MSRTC Bus Reservation पचा वापर प्रवाशांनी करावा, असे अवाहन केले आहे.

ऑनलाईन आरक्षण करताना प्रवाशांना तांत्रिक अडचण आल्यास ७७३८०८७१०३ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. हा नंबर प्रवाशांना तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी २४ तास सुरु असणार आहे. तसेच ऑनलाईन आरक्षण करताना पैसे भरुन देखील तिकीटे न येणे (पेमेंट गेट वे संदर्भात) या तक्रारींसाठी ०१२०-४४५६४५६ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा, आवाहन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत करण्यात आले आहे.

# जयक्रांती महाविद्यालयात जिल्हास्तरीय रासेयो अंकेक्षण शिबीर




लातूर : येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित जयक्रांती महाविद्यालयामध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा, नांदेड राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित लातूर जिल्ह्याचे अंकेक्षण शिबीर दिनांक २२ व २४ मे, २०२४ रोजी दोन दिवशीय शिबीर संपन्न झाले.

या शिबिराची उद्घाटन संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार, संचालक डॉ. मलिकार्जुन करजगी, प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, प्राचार्य श्री प्रशांत घार, चार्टर्ट अकाउंटंट श्री. अमोल मुळे, विद्यापीठाचे अॅकेडमी कौन्सिल मेंबर डॉ. नारायण कांबळे, जिल्हा समन्वयक डॉ. केशव आलगुले, यांची प्रमुख उपस्थिती होती. लातूर जिल्ह्यातील एकूण ५२ महाविद्यालयापैकी ३८ महाविद्यालयाने आपले ऑडिट करून घेतले. उर्वरित १४ महाविद्यालनी लवकरात लवकर आपल्या ऑडिट करून घेऊन विद्यापीठात सादर करावे असे आवाहन संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी यावेळी केले. सदरील शिबिर यशस्वी करण्यामध्ये दिव्यांश खेडकर, कृष्णा पांचाळ, कृष्णा ओणी, सुरज भोसले, अजय लामतुरे, यांनी परिश्रम घेतले. तसेच जयक्रांती महाविद्यालयातील कार्यालय प्रमुख डॉ रामेश्वर स्वामी, शिक्षकेतर कर्मचारी जाधव रामदास, विजय कनगुले, सचिन शिखरे, अमित भालके यांनी शिबीर यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# येरोळ येथे कृषी विभागातर्फे खरिप हंगामपुर्व प्रशिक्षण व बीज प्रात्यक्षीक

**प्रशांत तांबोळकर**



शिरूरआनंतपाळ : येरोळ ता.शिरूरआनंतपाळ येथील हनुमान मंदीरावर कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम पुर्व प्रशिक्षण व बीज प्रक्रिया प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणास तालुका कृषी अधिकारी लक्ष्मण खताळ, कृषी मंडळ अधिकारी राजवाड, येरोळ कृषी विभागाच्या कृषी साहाय्यक श्रीमती एम.ओ.मोदी, वार्डन कंपनीचे विभागीय प्रतिनीधी दयानंद काळशेटे आदी उपस्थित होते.

तालूका कृषी अधिकारी लक्ष्मण खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या प्रशिक्षणात कृषी सहायक श्रीमती एम, ओ. मोदी यांनी या खरिप हंगाम पुर्व प्रशिक्षणास जमलेल्या महिला व पुरुष शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक करुन दाखवले. उत्पादन वाढिची पंचसूत्री,मनरेगा अंतर्गत फळबाग,शेततळे या विषयी कृषी मंडळ अधिकारी राजवाडे यांनी तुर पिकावरील मर रोग नियंत्रण,शंखी गोगलगाय नियंत्रण या विषयी मार्गदर्शन केले. तसेच खरीप पुर्व नियोजन आढावा घेऊन शेतकऱ्यांना घरच्या सोयाबीन बियाण्याची उगवण क्षमता बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक करुन माती परिक्षणाची गरज,माती नमुना काढण्याची शास्त्रीय पद्धत,उतारास आडवी पेरणी,एक गाव एक वाण,खत व्यवस्थापन व बियाणे लागवड, महाडीबीटी पोर्टल वरुन कृषी यांत्रिकीकरण व ट्रॅक्टर ऑनलाईन अर्ज करणे व तसेच फळबाग, तुती लागवड,पीक विमा योजना या विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. हलक्या व मध्यम ते भारी जमिनीसाठी व टोकन पद्धतीसाठी कोणत्या बियाणाची निवड करावी व तुर आणि सोयाबीन उत्पादन तंत्रज्ञानाबद्दल माहिती देण्यात आली.शेतकऱ्यांनी खरीप हंगामाची पेरणी करताना शंभर मिमी पाऊस झाल्यावरच पेरणी करावी असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले.यावेळी उपसरपंच सतिस सिंदाळकर, आदर्श शेतकरी गुंडेराव चौसष्टे, नागनाथ पाटील कासार, रविनाथ तांबोळकर, मचिंद्र भालेकर, प्रल्हाद जंगमे, शामराव सिंदाळकर, संतोष पाटील यांच्यासह शेतकरी महिला बचत गटाच्या सदस्या गावातील शेतकरी नागरिक उपस्थित होते.

# नवीन कौठा येथे बुद्ध जयंती उत्साहात साजरी



नांदेड - नवीन कौठा परिसरातील संघर्षभूमी बुद्ध विहार कुशीनगर येथे २५६८ वा बुद्ध जयंती सोहळा उत्साहात साजरा झाला. यशोधरा महिला मंडळ व नवयुवक भीमजयंती मंडळ यांच्या वतीने बुद्ध जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. येथील ज्येष्ठ साहित्यिक अनुरत्न वाघमारे यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी प्रज्ञाधर ढवळे, मोहन जोगदंड, गौतम दवणे, सिद्धार्थ चिते, माधव खिलारे, अशोक कांबळे, चेतन मुळे, दलितनंद जोंधळे, अमोल भुतके यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला बुद्ध पौर्णिमेनिमित्त संघर्ष बुद्ध भूमी विहार या ठिकाणी यशोधरा महिला मंडळाच्या वतीने तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प, दीप व धुपाने पुजन करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर जेष्ठ साहित्यिक अनुरत्न वाघमारे व साहित्यिक विचारवंत प्रज्ञाधर ढवळे यांच्या हस्ते पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले

यावेळी उपस्थित मान्यवरांनी तथागत गौतम बुद्ध यांच्या विषयी आपले विचार मांडले व शुभेच्छा दिल्या यानंतर मंडळाचे कोषाध्यक्ष *सतीश अशोक कांबळे यांच्याकडून सर्व उपस्थित जनसमुदायास खीर दान करण्यात आली.

बुद्ध जयंती सोहळ्यासाठी नवयुवक भीमजयंती मंडळाचे सचिन कांबळे, मनोज जोगदंड, देवानंद झुंजारे. सिद्धार्थ कांबळे, जळबा सोनकांबळे, सोनबा गोलेर, योगेश भुतके, संतोष दुंडे, उत्तम कांबळे, आदींनी परिश्रम घेतले. त्रिसरण पंचशील, भीमस्तुती, त्रिरत्न वंदना आदी गाथा पठण महिला मंडळाच्या पुढाकाराने घेण्यात आले. या कार्यक्रमाला परिसरातील बौद्ध उपासक, उपासिका व बालक, बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

# बुध्द जयंती निमित्त अहमदपूर शहरात धम्मसंदेश रॅली संपन्न




अहमदपूर दि.२४ (कारामुंगीकर) - तक्षशिला बुध्द विहार काळेगांव च्या वतीने तथागत भगवान गौतम बुध्द यांच्या जयंतीच्या निमित्त शहराच्या प्रमुख मार्गावरून धम्मसंदेश रॅली मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

तक्षशिला बुध्द विहाराचे प्रमुख भंते महाविरो थेरो यांच्या नेतृत्वाखाली,श्रध्दावान उपासक युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत ही रॅली संपन्न झाली. काळेगांव येथील तक्षशिला विहारात श्रमाने शिबीर घेण्यात आले.या शिबिराच्या समारोप धम्म संदेश रॅलीच्या माध्यमातून करण्यात आला.

ही रॅली काळेगांव रोड इंदिरानगर, बौध्द नगर, भिम नगर, आझादचौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरून छत्रपती शिवाजीमहाराज चौक-पुतळ्या समोरून स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर चौक, तहसिल कार्यालया समोरून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या आली.

येथे सामूहिक त्रीशरण पंचशिल बुध्द, धम्म व संघ वंदना,भीम स्तुती व सरणंतय गाथा घेण्यात आली.

या प्रसंगी उपस्थित जनसमूदायास पुज्य भंते महाविरो थेरो यांनी मार्गदर्शन केले.तर युवकनेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. या वेळेस माजी नगराध्यक्ष सरस्वतीबाई कांबळे, अंजलीताई वाघंबर, अण्णाराव सूर्यवंशी,सावन कदम,पत्रकार अजय भालेराव,भीमराव कांबळे, सचिन बानाटे, आनंदभाऊ सोनकांबळे, संगमेश्र्वर बनसोडे, सिध्दार्थ वाघमारे, आनंद जंगले,रूपेश कांबळे,अनिल वाघमारे, संविधान कदम, बल्लू वाघमारे,आकाश पवार, शिवराम गायकवाड, सिध्देश्र्वर मस्के, नितीन सरकाळे, आनंद वाघमारे, शिवलिंग वाघमारे, सूमनबाई काबळे,मंगलबाई गायकवाड,पोटभरे ताई आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी रॅलीच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

या रॅलीत उपस्थित श्रामनेर यांनी हातात मेणबत्त्या पेटवून घेतल्या होत्या. त्यांच्या वतीने बूध्द धम्म आणी संघाच्या घोषणा सूध्दा लक्षवेधी होत्या. अतिशय शिस्त बध्द, संचालन करत डॉ.बाबासाहेब आंबेडकर- बुध्दांचा जयघोष आदीं बाबींमूळे ही शांतता रॅली अभूतपूर्व अशीच ठरली.

# पावसाळपूर्व वसंतनगरभागातील रेंगाळलेली कामे पूर्ण करण्याची मागणी

नांदेड : शहरातील वसंतनगर भाग हा सखल भाग म्हणून ओळखला जातो याठिकाणी गतवर्षीच्या पावसाळ्यात घरोघरी पाणी शिरल्यानंतर यावर्षी देखील तशी परिस्थती उद्धवू नये म्हणून प्रशासनाकडून नालीचे बांधकामाचे सुरु करण्यात आले आणि काही ठिकाणचे काम सोडल्यास काम पूर्ण देखील झाले मात्र नाली बांधण्यात आली मात्र रोडचे पाणी नालीत जाण्यासाठी नालीला तोंड ठेवलेले नाहीत हे विशेष. नुकताच आठ-दहा दिवसाखाली अवकाळी मोठा पाऊस झाला त्यावेळेस पूर्ण रस्त्यावर पाणी साचले होते. त्यानंतर तरी महापालिका प्रशासन आणि संबंधीत विभाग याकडे लक्ष देवून काम करेल अशी अपेक्षा होती मात्र आता मान्सून तोंडावर आलेला असतांना देखील परिस्थिती जैशी थी अशी आहे यामुळे याठिकाणी प्रशासनाने वेळीच लक्ष देवून मान्सून पूर्व रोडचे पाणी नालीत जाण्यासाठी नालीला तोंड करण्याची तसेच इतरही रेंगाळलेली कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी होवू लागली आहे.

तसेच याभागात ड्रेनेज लाईनचे काम किती दिवस सुरु राहणार हे मात्र याभागातील लोकांना समजत नाही आहे. ड्रेनेजचे कामासाठी रस्ते खोदून पाईप टाकण्यात आले चेंबर बनविण्यात आले मात्र चेंबरला घरांचे कनेक्शन देण्याची काम अद्यापही सुरु झालेले नाही तसेच ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी खोदतांना मातीचे ढिगारे जशास तशे टाकण्यात आले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या मतदाना अगोदरचे हे ढिगारे अजूनही तशेच आहेत. श्री मुक्तेश्र्वर आश्रमसमोरील रोडवर थोडा-फार अवकाळी पाऊस झाला तर सगळा चिखलच चिखल होवून बसत आहे. ड्रेनेज काम करतांना मातीचे ढिगारे उचलून नेणे गरजेचे असतांना ते तशेच ठेवून दुसरीकडे ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी गुत्तेदार जात आहेत. संबंधीत गुत्तेदाराच्या कारभाराकडे कुणाचेही लक्ष नाही का ? असा संतप्त प्रश्र्न याठिकाणचे रहिवासी विचारत आहेत. तसेच या भागात श्री मुक्तेश्र्वर आश्रम आणि श्री स्वामी समर्थ केंद्र अशी दोन मंदिरे आहेत. याठिकाणी शहरातील बहुतांश जण दर्शनसाठी येतात. या दोन मंदिरांसाठी (धार्मिक स्थळांसाठी) जाण्यासाठी देखील आनंदनगर ते महादेव दालमिल रोड हा मुख्यरस्त्यावरुन मंदिरात जाण्यासाठी चार चाकी वाहन जाण्यासाठी देखील अजूनही काही रस्ते जोडण्यात आलेले नाहीत. रस्त्याच्या काम मागील बयाच दिवसापासून सुरु आहे मात्र चार चाकी वाहने जाण्यासाठी पुरता रस्ता जोडणे गरजेचे मात्र याठिकाणी हे देखील झालेले नाही. दुचाकी जाण्यासाठी रस्ते जोडण्यात आलेत मात्र बाहेरील चार चाकी वाहन आल्यास वाहने अडकत आहेत. वाहनाचे चाके रोड छोटा असल्यामुळे खाली उतरुन गाड्या फसत आहेत तेंव्हा याठिकाणी लक्ष देवून पावसाळापूर्व वसंतनगर भागातील रेंगाळलेली कामे पूर्ण करण्याची मागणी होत आहे.

## टी. सी. हरवली आहे

मुकेश मारुती कुमठेकर या नावाची महेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरूर ताजबंद तालुका अहमदपूर येथील १२ वी पास ची टी. सी. अहमदपूर-लातूर प्रवासात हरवली आहे.

सदरील टी. सी. कोणास सापडल्यास खालील मोबाईलवर संपर्क करावा.

– संपर्क मो.नं.८६६९४५८०७९

यशवंत धाराशिव जिल्हा
शनिवार दि. २५ मे २०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

# पिंपरी येथील नुकसानग्रस्तांना तात्काळ मदत द्यावी

धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – धाराशिव तालुक्यातील पिंपरी (बे) येथे चक्रीवादळामुळे मोठे नुकसान झाले असून अनेक जणांच्या घरावरील पत्रे उडालेली ते बेघर झालेले आहेत. त्यामुळे त्यांचा संसार उघड्यावर आला असून या नुकसानीचे पंचनामे करुन त्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय बहुजन ओबीसी अल्पसंख्याक भ्रष्टाचार निर्मूलन असोसिएशनच्यावतीने एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांकडे दि.२४ मे रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, धाराशिव तालुक्यातील पिंपरी येथे सक्रिय वादळाचा मोठा पाऊस झाल्यामुळे ७० ते ८० घरात वरील पत्रे वाऱ्याने उडून गेले आहेत. त्यांच्या निवाऱ्याची व्यवस्था करून द्यावी. तसेच शेतीचे नुकसान झाले असून नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष सय्यद कलीम मुसा यांनी केली आहे.

# सावकाराने हडपलेली जमीन शेतकऱ्याला परत देण्यासह खरेदीखत रद्द

## सावकाराच्या मनमानीला जबर दणका

धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – ट्रॅक्टरचे कर्ज मिळण्यासाठी एका शेतकऱ्याने सव्वा दोन एकर जमीन सावकाराकडे गहाण ठेवत, त्या बदल्यात ती जमीन परत देण्याच्या अटीवर खरेदी खत करून दिली. मात्र सावकार आणि ती जमीन हडपली. त्यामुळे याप्रकरणी संबंधित शेतकऱ्याने जिल्हाधिकारी व सावकार निबंध तथा जिल्हा सहाय्यक उपनिबंधक यांच्याकडे दाद मागितली. सर्व पुराव्या अंती ती जमीन संबंधित शेतकऱ्याला परत देण्यासह केलेले खरेदी खत रद्द करुन सातबारा उताऱ्यावर नाव घेण्याचे आदेश सावकारांचा जिल्हा निबंधक तथा जिल्हा उपनिबंधकांनी दिले आहेत.

कळंब तालुक्यातील उपळाई येथील बाबुराव महादेव शेंडगे यांनी बार्शी तालुक्यातील देवगाव येथील सावकार वैजनाथ गणपती मार्कड यांना ट्रॅक्टरचे काढलेले कर्ज परतफेड करण्यासाठी पानगाव येथील जमीन गट नं.७७/३/३ मधील क्षेत्र ०० हे. ५० आर व गट नं.७७/ब/२ मधील क्षेत्र ०० हे. ४० आर ज्याचा खरेदीखत क्र. १५९३/२००२ दि.८/८/२००२ रोजी जमीनीचे खरीद खत परत देण्याच्या अटीसह दिले होते. सावकाराने ५ टक्क्यांनी ६० हजार रुपये दिले होते. त्या बदल्यात शेतकऱ्याकडून ७० हजार रुपये घेतले. तरी देखील सावकार ती जमीन मात्र प्रकरण चालू असताना त्या सावकाराने ती जमीन तिसऱ्या व्यक्तीच्या नावे खरेदी खत करून दिली. या प्रकरणी बाबुराव शेंडगे या शेतकऱ्याने जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केल्यानंतर कळंब येथील सहाय्यक निबंधक यांच्याकडे चौकशीसाठी प्रकरण गेल्यानंतर त्यांनी सखोल चौकशी करून पंचनामे करून लेखी जबाब नोंदविले. त्यानंतर ती जमीन सावकारकीमधून खरेदी खत केली व परत करण्याच्या अटीवर खरीद खत करून घेतल्याचे दिसून येत असल्याचा अहवाल दिला. न्यायालयासमोर आलेले पुरावे, जबाब, कागदपत्र व महाराष्ट्र सावकार अधिनियम २०१४ च्या कलम १८ /२ नुसार हे प्रकरण बेकायदेशीर असल्यामुळे शेतकऱ्यास जमीन परत करावी. तसेच ते खरेदी खत रद्द करून जमिनीचा ताबा संबंधित शेतकऱ्याला देण्यासह सातबारावर संबंधित शेतकऱ्याचे नाव घेण्यात यावेत. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम १८ (६) अन्वये पोटकलम (४) अन्वये तरतूद केलेल्या अपीलाच्या अधिनतेने सदरील आदेश हे पुरेसे अभिहस्तांतरणपत्र असून, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ पहा. ४१) या अन्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वने जमीनीचे अभिलेख ठेवण्या संबंधातील काम सोपविण्यात आलेल्या प्रत्येक अधिकाऱ्याचे त्याच्या अभिलेखात अशा आदेशाची अंमलबजावणी करणे, हे कर्तव्य असेल असे आदेश सावकारांचा जिल्हा निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बालाजी काळे यांनी दिले आहेत. या प्रकरणी ॲड संदीप कठारे यांनी बाजू मांडली. त्यांना ॲड महेश कठारे, ॲड एम.पी आपचे व ए.एस. पाटील यांनी सहकार्य केले.

# छ. संभाजी महाराज जयंती मिरवणुकीत शिवकालीन मर्दानी खेळ

## संपूर्ण परिसर शिवमय वातावरणात न्हाले



मुरुम दि.२४ (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजी महाराजांच्या मुर्तीची मुरुम शहरातून दि.२३ मे रोजी भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत शिवकालीन मर्दानी खेळ, पारंपरिक वेशभूषा, तलवारबाजी, दांडपट्टा, भाला, अग्नीचक्र अशा अनेक शिवकालीन खेळांची प्रात्यक्षिके सादर करून शिवभक्तांची नागरिकांची मने जिंकली.

छत्रपती संभाजीराजे ग्रुपच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त मिरवणुकी दरम्यान शहरातील मिरवणूक मार्गावरील सर्वच चौकात आयोजित करून शहरवासियांची मने जिंकली. कराड येथील हिंदुतेज शिवकालीन दांडपट्टा आखाड्याच्या कलाकारांनी मुख्य प्रशिक्षक अभिजीत गिरींच्या नेतृत्वात मर्दानी कलेच्या खेळांचे देखाव्याच्या स्वरूपात आयोजन केले. दरम्यान मिरवणुकीत पुरुषांबरोबर तरुणींनीही या मर्दानी खेळात सहभाग नोंदवला. अगदी नऊवारी साडी नेसून कपाळावर चंद्रकोर लावून तरुणी या खेळांमध्ये पुरुषांपेक्षा एक पाऊल पुढे होत्या. विशेष म्हणजे हातात काठी, ढाल, तलवार असे एखादे शस्त्र घेतले की जणू काही त्यांच्या अंगातील रक्तच या ठिकाणी सळसळत होते, इतक्या सुंदर व अप्रतिम मर्दानी कलेचे त्यांनी सादरीकरण केले. मिरवणूकीची सुरुवात छत्रपती संभाजीनगर येथून झाली. शिवशंभूच्या नामाचा जयघोषाने आसमंत दुमदुमला. या मिरवणूकीत लहान मुले, मुली, गावातील शिवभक्त डोक्यावर भगवे फेटे बांधून मिरवणूकीत सहभागी झाले होते. यावेळी डिजेच्या तालावर तरुणाईचा ठेका आणि फटाक्यांची आतषबाजीमुळे संपूर्ण मुरुम शहर शिवमय झाले होते. शिवभक्तांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी मुरुम पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप दहिफळे व पवनकुमार इंगळे, यांच्या मार्गदर्शनाखाली पांडुरंग पवार, मिलिंद साकंळे, रमांकात परीट, अजय माळी, बळीराम लोंढे यांच्यासह इतर पोलिस बांधवांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# आ. पाटील यांचा अवकाळीच्या नुकसानीची पाहणी करीत शेतकऱ्यांना धीर

## जनता दरबारात केली प्रश्नांची सोडवणूक



धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची बिकट परिस्थिती असून गरजेप्रमाणे बोअर अधिग्रहण व टँकर उपलब्ध करून देण्यासह रोजगार हमी योजनेची कामे वाढविण्याच्या सूचना आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्र्वभूमीवर नागरिकांच्या अडी अडचणी जाणून त्यांची सोडवणूक करण्याच्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टी कार्यालय, तुळजापूर येथे जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करून नुकसानग्रस्तांना धीर दिला. तुळजापूरसह इतर तालुक्यातील अनेक नागरिकांनी येथे उपस्थित राहून आपल्या अडचणी मांडल्या. पिण्याचे पाणी, महावितरण, रोजगार हमी योजनेची कामे, रस्त्यांची रखडलेली कामे मार्गी लावण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत.

दि.२३ मे रोजी सायंकाळी धाराशिव तालुक्यातील काही गावांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसामुळे घरे, गोठे व फळबागांचे मोठे नुकसान झाले असून आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी आज इर्ला, दाऊदपुर, भंडारवाडी परिसरात जावून नुकसानीची पाहणी केली. प्रशासनाला तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या वादळी वारे व पावसाने घरावरील पत्रे उडून गेले असून अनेक कुटुंबे उघड्यावर आली आहेत. मोडून पडलेला संसार, उघड्यावर आलेली लहान लेकरे असे हृदयद्रावक चित्र होते. नागरिकांनी, शेतकरी बांधवांनी धीर धरावा, शासनाच्या माध्यमातून त्यांना मदत मिळवून देण्याचा नक्की प्रयत्न राहणार आहे. अतिशय भीषण व विदारक परिस्थिती असून शेतकरी व ग्रामस्थांच्या पाठीशी खंबीरपणे असल्याचा विश्र्वास आ. पाटील यांनी दिला आहे.

# शंभूभक्तांवरील अमानुष लाठी हल्ला करणाऱ्या अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याची मागणी




धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त लाटी हल्ला करणाऱ्या विभागीय पोलीस अधिकारी राठोड व इतर कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात यावे अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाच्यावतीने जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्याकडे एका निवेदनाद्वारे दि.२४ मे रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले की, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती दरम्यान धाराशिव शहरातील इंगळे गल्ली परिसरातील शंभूभक्तांनी मिरवणूक काढली होती. मिरवणूक सुरू असताना शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पवार व पोलीस कर्मचारी स्वामी तेथे आले व त्यांनी डीजे फोडला. त्यानंतर पोलीस उपविभागीय अधिकारी स्वप्निल राठोड यांनी छत्रपती संभाजी महाराज जयंती मंडळाच्या कार्यकर्त्यांना जातीवाचक शिवीगाळ करत छत्रपती संभाजी महाराजांच्या मावळ्यांवर विनाकारण अमानुष लाठी हल्ला केला. या लाठी हल्ल्यामध्ये मंडळाचे बरेच कार्यकर्ते जखमी झाले असताना देखील प्रशासनाने त्यांच्यावरतीच खोटे गुन्हे दाखल केले. या जयंती मिरवणुकीवर लाठी हल्ला करून हिंदू समाजाच्या भावना दुखावणाऱ्या उपविभागीय पोलीस अधिकारी राठोड, पोलीस निरीक्षक पवार, स्वामी व इतर पोलीस कर्मचाऱ्यांना तात्काळ १० दिवसांच्या आतमध्ये बडतर्फ करण्यात यावे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा संघाचे जिल्हाध्यक्ष मोहन मुंडे यांनी दिला आहे. यावर पप्पू देशमुख, सुरेश शेरकर, यश हंचाटे, गणेश लावंड, अजय उंबरे, प्रथमेश पडवळ, सुजित उंबरे, विजय उंबरे, अजित उंबरे, महेश लावंड, मयुर वंडरे, सोहम मस्के, प्रवणराज शेरकर, करण शेरकर, निखिल मते, निखिल इंगळे, आशिष मोरे, धीरज शेरकर, गणेश लोहार, योगेश ढोबळे, अजिंक्य मोरे, विवेक मुंडे, दिनेश बारकुल आदींच्या सह्या आहेत.

# धाराशिव येथे बुद्ध जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी

धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – विश्र्वाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांची जयंती धाराशिव शहरात ठिकठिकाणी विविध उपक्रमांनी दि. २३ मे रोजी साजरी करण्यात आली. दरम्यान शहरातून काढण्यात आलेल्या रॅली दरम्यान युद्ध नको, बुद्ध हवा यांसह विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

धाराशिव शहरातील तथागत गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस धुप, दीप व पुष्प अर्पण करून त्रिशरण पंचशील व गाथा पठण करण्यात आले. शहरातून रॅली काढण्यात आली. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे वरिष्ठ केंद्रीय शिक्षक पी एम वाघमारे गुरुजी, जिल्हाध्यक्षा विजयमाला धावारे, जिल्हा सरचिटणीस विद्यानंद वाघमारे, जिल्हा कोषाध्यक्ष राजश्रीताई कदम, माजी नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे, भारतीय बौद्ध महासभा तालुकाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, तालुका पर्यटन उपाध्यक्ष स्वामीराव चंदनशिवे, तालुका पर्यटन सचिव धनंजय वाघमारे, समता सैनिक दलाचे सचिन दीलपाक, स्वराज्य जानराव, पुष्पकांत माळाळे, धनंजय शिंगाडे, बाबासाहेब कांबळे, कबीर बनसोडे, विद्यानंद बनसोडे, मुकेश मोठे, भिख्खू संघाचे संघनायक भन्ते विजय बनसोडे, उमाजी गायकवाड, बापू जावळे, अमोल अंकुश, श्रेयस बनसोडे, प्रज्योत सिरसाठे, विश्र्वदीप बनसोडे, हर्षदीप बनसोडे, प्रनिक गायकवाड, विपुल गायकवाड, अनिकेत कदम आदींसह मुले, मुली, महीला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच शाहूनगरमधील जेतवन कॉलनी येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त महिलांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तर कमलाकर गायकवाड यांनी बुद्ध वंदना घेतली. यावेळी सोमनाथ वाघमारे, राम चंदनशिवे, बाळासाहेब माने, रमाकांत गायकवाड, सुधीर गायकवाड, राम राऊत,



अण्णासाहेब वाघमारे, शिरसाट, भारत शिंदे, संपत शिंदे, म्हस्के मीराताई शिंदे, ताई कांबळे, पवार, शोभाताई चंदनशिवे, ओव्हाळ, झेंडे, माने, संगीता गायकवाड आदींसह बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महेश वाघमारे, भागेश वाघमारे, सुबोध शिंगाडे, काका गोरे, रितेश कांबळे, ऋतिक शिंदे, रोहन कटारे, धीरज शिंदे, गणेश फडके, सुबोध शिंगाडे, शाहूनगर उत्सव व अभिवादन समितीचे अध्यक्ष राजरत्न शिंगाडे यांनी प्रयत्न केले.



## संपादकीय

# पंतप्रधान मोदींना विश्वास, एनडीए ४०० पार करणार

लोकसभा निवडणुकीसाठी मतदानाचे पाच टप्पे पूर्ण झाले. चौथ्या टप्प्यापासूनच वेगवेगळ्या संस्था, संघटना, यूट्यूबवर भाजपाची घसरण होणार असे अंदाज व्यक्त केले जात आहेत. सोशल मीडियावर भाजपाला बहुमत मिळणार नाही व मोदी पंतप्रधान होणार नाहीत अशी आकडेवारी दिली जात आहे. राहुल गांधी, शरद पवार किंवा उद्धव ठाकरे यांच्या भावना अशा आकडेवारीतून प्रकट होत आहेत. समाजाला फसविण्याचा एक मोठा प्रयोग चालू आहे. मोदींच्या कारभाराला लोक कंटाळले आहेत, असे कारण देऊन भाजपाला या निवडणुकीत मतदान कमी होत आहे व भाजपा बहुमताचा आकडा ओलांडणार नाही, असे विश्लेषण केले जात आहे.

निवडणूक प्रचारात इंडिया आघाडीचे नेते भाजपाच्या विरोधात भाषणे ठोकतात. मोदींविषयी इंडियातील नेत्यांना पराकोटीचा द्वेष वाटतो आहे हे त्यांच्या भाषणातून व मुलाखतीतून रोज जाणवते. पण सर्व्हे करणारे व स्वयंघोषित विश्लेषक म्हणविणारे ४ जूनला इंडियाचे सरकार येणार हे कशाच्या आधारावर सांगत आहेत? लोकांची दिशाभूल करायची व निकालानंतर इंडिया आघाडीच्या पराभवाचे खापर हे ईव्हीएम मशीनवर फोडायचे हे फार मोठे षडयंत्र आधीपासूनच रचले आहे. त्यातलाच एक भाग म्हणून भाजपाचे दिग्गज उमेदवार पडणार असा गोलमाल प्रचार सोशल मीडियावरून वेगाने चालू आहे.

मतदानाचा पाचवा टप्पा झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींची एक मुलाखत देशातील सर्वात मोठ्या मीडिया समूहाच्या दैनिकांत प्रसिद्ध झाली आहे. ही मुलाखत त्यांच्या विरोधकांनी वाचली, तर मतदानानंतर तरी मोदी द्वेष कमी करतील अशी अपेक्षा आहे. मोदींच्या सभा गेले दोन-तीन महिने सर्व देशभर चालू आहेत. त्यांच्या सभांना लोटणारी लक्षावधी लोकांची गर्दी आणि मोदींचा व्यासपीठावर प्रवेश झाल्यावर लोकांकडून उत्स्फूर्तपणे मोदी- मोदी असा होणारा जयघोष ऐकला तर मोदी हे देशाचे पुन्हा पंतप्रधान होणार, मोदी हेच पंतप्रधानपदाची हॅटट्रीक पूर्ण करणार, मोदींच्या नेतृत्वाखालीच केंद्रात पुन्हा भाजपप्रणीत एनडीएचे सरकार येणार हे मोदींच्या कट्टर शत्रूला मान्य करावे लागेल. पण त्यासाठी त्यांनी डोळ्यांवर ओढलेली झापडे दूर केली पाहिजेत.

लोकसभेत भाजपाचे ३७० खासदार आणि एनडीएचे ४०० हून अधिक खासदार निवडून येणार हा मोदी-शहा यांनी संकल्प जाहीर केला आहे. निवडणूक प्रचारात विरोधी नेत्यांनी मोदी- शहांवर पातळी सोडून टीका केली, पण भाजपाच्या या दोन दिग्गज नेत्यांनी आपला संयम कधीच सोडला नाही. मतदानाच्या चौथ्या टप्प्यानंतरच भाजपाने बहुमत गाठले आहे, असे मोदी- शहा आत्मविश्वासाने सांगत आहेत. पाचव्या टप्प्यानंतर आता आमची वाटचाल ४०० कडे चालू आहे, अशीही या दोन्ही नेत्यांनी पुष्टी जोडली आहे. त्यामुळे इंडिया आघाडीतील नेत्यांचे पित्त खवळले आहे. सन २०१४ व २०१९ या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या निकालाचे सर्व विक्रम २०२४ च्या निकालाने मोडले जातील व भाजपा विजय मिळविताना नवीन विक्रम निर्माण करील, असे मोदींनी म्हटले आहे. अब की बार ४०० पार हा संकल्प निकालानंतर ४ जून रोजी सत्यात उतरलेला दिसेल असे मोदी सांगत आहेत.

यंदाच्या निवडणुकीत जम्मू-काश्मीरमध्ये अपेक्षेपेक्षा चांगले मतदान झाले व प्रथमच मतदानासाठी काश्मीरमध्ये मतदान केंद्रावर रांगा लागलेल्या दिसल्या, याचे श्रेय मोदी सरकारला दिले पाहिजे. आमचा मतदानावर विश्वास नाही, भारतीय लोकशाहीला आम्ही मानत नाही, असे विष काश्मिरी जनतेच्या मनात वर्षानुवर्षे फुटीरतावाद्यांनी भिनवले होते. पण गेल्या दहा वर्षांत मोदी सरकारने काश्मीरसाठी व काश्मिरी जनतेसाठी जे काम केले, कल्याणकारी योजना राबविल्या, त्यांना देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला, त्याचा परिणाम तेथील मतदारांचा भारत सरकारवर विश्वास वाढला. विशेषत, पंडित नेहरूंच्या काळापासून काश्मीरला विशेषाधिकार देणारे ३७० कलम लागू होते, पण हे कलम रद्द करण्याचे धाडस मोदी सरकारने दाखवले.मोदी सरकार सत्तेवर नसते, तर या जन्मात ३७० कलम कधीच हटवले गेले नसते. ३७० कलम हटविल्यामुळे काश्मिरी जनतेत असलेली वेगळेपणाची भावना संपुष्टात आली आहे. भारतीय नागरिक म्हणून ते मुख्य प्रवाहात आले आहेत. काश्मीरमध्ये भ्रष्टाचार प्रचंड आहे, सर्व प्रशासन व व्यवस्था भ्रष्टाचाराने बरबटली आहे. वर्षानुवर्षे ठरावीक घराण्यांनी सत्ताकेंद्रे काबिज केली होती. मोदी सरकारने कठोर उपाय योजले, कल्याणकारी योजना थेट जनतेच्या दारात पोहोचवल्या व जनतेत विश्वास निर्माण केला, त्याचाच परिणाम या निवडणुकीत तेथे उत्साहाने भरीव मतदान झाले. मोदी सरकार पुन्हा केंद्रात आल्यानंतर पाकिस्तानव्याप्त काश्मीरही भारतात आणला जाईल, असे भाजपाच्या नेत्यांनी म्हटले आहे. पाकव्याप्त काश्मिरी जनतेलाही तेथील जुलमी प्रशासनाच्या गुलामगिरीतून मुक्त व्हायचे आहे. मोदी पंतप्रधान असतील तरच हे होऊ शकते, इंडिया आघाडीच्या नेत्यांची तशी कुवत नाही आणि तसा ते विचारही करू शकत नाहीत.महाराष्ट्रात पाच टप्प्यात मतदान पूर्ण झाले आहे. महाराष्ट्रात भाजपाला पूर्वीसारखे यश मिळणार नाही, अशी भाकिते वर्तवली जात आहेत. पण स्वत: मोदी मात्र महाराष्ट्रात भाजपाला चांगले यश मिळेल, असा विश्वास व्यक्त करीत आहेत. शरद पवार- उद्धव ठाकरेंच्या घराणेशाहीला लोक कंटाळले आहेत. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील असली शिवसेना व अजित पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस भाजपाबरोबर आहे. कारण त्यांना देशाचा व राज्याचा विकास साधायचा आहे, असे मोदींनी म्हटले आहे. पराभवाची चाहूल लागल्यामुळे शरद पवार आतापासूनच निकालानंतर प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलिन होतील, अशी भाषा करीत आहेत याचीही आठवण मोदींनी करून दिली आहे.

# आयोगाने फटकारले




धर्मनिरपेक्ष देशात घटना सर्वोच्च असते. तरीही भाजप सतत धर्माच्या आधारे प्रचार करत आहे. हे गैर आहे. त्याला उत्तर देताना काँग्रेसने देखील संयम पाळणे आवश्यक आहे हे आयोगाने अधोरेखित केले आहे. निवडणुकीच्या प्रचारात प्रक्षोभक भाषणे न करण्याची समज आपल्या स्टार' प्रचारकांना देण्याचा आदेश निवडणूक आयोगाने भारतीय जनता पक्ष व काँग्रेस या दोन प्रमुख पक्षांना दिला आहे. मागील अनेक निवडणुकांच्या तुलनेत या वेळी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात प्रक्षोभक भाषणे जास्त प्रमाणात दिली जात आहेत हे सामान्य माणूसही जाणतो. धर्म आणि समुदाय किंवा जातीयवादाच्या आधारावर बोलणे टाळण्यास आपल्या स्टार' प्रचारकांना सांगावे असे निवडणूक आयोगाने भाजपला बजावले आहे. तर घटना रद्द केली जाईल असा निराधार प्रचार न करण्यास काँग्रेसने आपल्या स्टार' प्रचारकांना सांगावे असे आयोगाने काँग्रेसला सुनावले आहे. भाजपचे अध्यक्ष जे.पी. नड्डा आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना आयोगाने नोटिसा बजावल्यानंतर सुमारे एका महिन्याने आयोगाने दोन्ही पक्षांना तंबी दिली आहे. प्रचारात आदर्श आचार संहितेचा भंग केल्याची तक्रार काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरुद्ध तर भाजपने राहुल गांधी यांच्या विरुद्ध केली होती. त्या बद्दल दोन्ही अध्यक्षांना आयोगाने नोटीस बजावली. संबंधित नेत्यांऐवजी पक्षांच्या अध्यक्षांवर आयोगाने नोटीस बजावण्याची ही पहिलीच वेळ आहे. आरोपांची चिखलफेक

प्रचारात प्रक्षोभक भाषणे करून आचार संहितेचा भंग आधी कोणी केला हा वादाचा मुद्दा आहे. काँग्रेस मुस्लिमांचा अनुनय करत आहे हा भाजप व संघ परिवाराचा जुना आणि आवडता आरोप आहे. त्याची पुनरुक्ती मोदी यांनी राजस्तानात प्रचार सभेत केली. काँग्रेस सत्तेत आल्यास हिंदूंची मालमत्ता घुसखोरां'ना आणि ज्यांना जास्त अपत्ये आहेत त्यांना वाटेल असा आरोप मोदी यांनी केला होता. त्या नंतर काँग्रेस मंगळसूत्र' हिसकावून घेईल अशा आशयाचे विधान केले. काँग्रेसचे एक नेते सॅम पित्रोदा यांच्या एका विधानाच्या आधारे त्यांनी हे आरोप केले; पण त्या आधीही उत्तर प्रदेशाच्या निवडणुकीत आदित्य नाथ यांनी कब्रस्तान' व स्मशानभूमीवरून विधाने केली होतीच. तेव्हा त्यांना कोणी नोटीस बजावली नव्हती. या वेळी मुस्लिमांना लक्ष्य करून मोदी आणि भाजपच्या अन्य अनेक नेत्यांनी देशाच्या विविध भागांतील प्रचारसभांमध्ये अनेकदा विधाने केली. राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्यात सहभागी न होता काँग्रेसने पाप' केले आहे असे खुद्द नड्डा म्हणाले होते. राम मंदिरास काँग्रेस बाबरी मशिदीचे कुलूप लावेल असे मोदी म्हणाले होते. भाजप घटना बदलू इच्छित आहे किंवा रद्द करू पाहात आहे अशा आशयाचे विधान राहुल गांधी यांनी केले होते. भाजपला चारशे जागा मिळाल्यास लोकसभेत दोन तृतियांश बहुमत मिळेल व मग घटना बदलता येईल अशा आशयाचे विधान भाजपचे एक खासदार अनंत कुमार हेगडे यांनी ९ मार्च रोजी केले होते. त्या आधारे राहुल गांधी यांनी प्रचार सभेत विधान केले. येथे प्रथम प्रक्षोभक विधान कोणी केले हा प्रश्न येतो. राहुल यांनी अग्निवीर योजनेवरही टीका केली होती. तसे न करण्याची समज निवडणूक आयोगाने त्यांना दिली आहे. नड्डा यांच्यावर बजावलेल्या नोटिशीत, समाजात फूट पडेल अशा स्वरूपाची विधाने न करण्याचे आपल्या प्रचारकांना सांगावे असे आयोगाने म्हटले आहे. त्यावर उत्तर देताना, काँग्रेसच्या वाईट हेतूंना उघड करण्याच्या हेतूने पंतप्रधानांनी विधाने केली असा खुलासा नड्डा यांनी केला आहे. त्यावर, तुमच्या उत्तरात वस्तुस्थिती नाकारलेली नाही, असे आयोगाने म्हटले आहे. त्यालाही फटकारणे म्हणावे लागेल. विरोधक सर्व भ्रष्ट आहेत असे मोदी वारंवार म्हणत आहेत, हा आचारसंहितेचा भंग नाही का? लोक प्रतिनिधी कायद्यासह देशात नेत्यांच्या आचरणाच्या बाबतीत काही कायदे आहेत. निवडणुकीच्या काळातील प्रचाराचा दर्जा व तीव्रता यांना नियंत्रित करण्यासाठी आचारसंहिता असते असे आयोगाने स्पष्ट केले आहे. लोकसभा निवडणूक आता शेवटच्या टप्प्यात आली आहे. त्या वेळी ही समज देऊन फार फरक पडेल असे वाटत नाही. तरी पण पक्षांना फटकारल्याबद्दल निवडणूक आयोगाचे कौतुक केले पाहिजे.

# जादा उष्णतेमुळे द्राक्ष उत्पादनात ऐंशी टक्के घट

सध्या देशात तपमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. वाढते तपमान सर्वच गोष्टींसाठी धोकादायक आहे. मानवी आरोग्यासह शेती पिकांनादेखील या वाढत्या तपमानाचा फटका बसत आहे. सध्या वाढत्या तपमानामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. विशेषत: तामिळनाडू राज्यातील द्राक्ष उत्पादकांना तपमानवाढीचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. जवळपास ८० टक्क्यांहून अधिक द्राक्ष उत्पादन घटण्याची शक्यता आहे.



तमिळनाडू राज्यात वाढत्या तपमानामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. या वर्षी उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्यात पन्नीर थिराचाई आणि ओडैपट्टी सीडलेस द्राक्षे या द्राक्षाच्या दोन मुख्य जाती आहेत. साधारणपणे एका एकरात १०-१२ टन द्राक्षाचे उत्पादन अपेक्षित असते; मात्र या वेळी तपमान जवळपास ३९ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त राहिल्याने एकरी उत्पादन तीन टनांपेक्षा कमी होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. म्हणजे ८० टक्क्यांनी उत्पादन घटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार एक एकर द्राक्ष बागेला साधारणत: एक लाख २५ हजार रुपयांचा खर्च करावा लागतो. उत्पादनात मोठी घट आली तर शेतकऱ्यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. उष्णतेची लाट आल्यामुळे सर्वच शेतकरी चिंतेत आहेत. दरम्यान, पिकांचे नुकसान होत असताना राज्य सरकारने ऊस आणि धानासाठी केली होती, तशी मदतीची तरतूद द्राक्ष पिकासाठी करावी आणि किमान आधारभूत दर ५० रुपये प्रति किलो असावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# इच्छाशक्तीच्या बळावर जगही जिंकता येते

केवळ सव्वा वर्षांची असताना मेंदुज्वरामुळे दृष्टी आणि ऐकण्याची क्षमता गमावलेली एक मुलगी आज जगविख्यात लेखिका म्हणून नावारूपाला आली आहे. तुम्हाला हा चमत्कार वाटत असेल तर, त्याची जनकही हीच मुलगी आहे. हेलेन केलर असे या मुलीचे नाव.

आपल्या केवळ इच्छाशक्तीच्या बळावर तिने आपल्या कठीण मानल्या जाणाऱ्या आजारालाही नियंत्रित केले. ज्या वयात तिचे खेळायचे-बागडायचे दिवस होते, त्या वयात तिच्या पुढ्यात केवळ अंधार होता.आजारामुळे तिला सुरुवातीला नैराश्य आले होते. तिच्या पालकांनी मग तिची जबाबदारी एनी सुलियन यांच्याकडे सोपवली. अगदी ब्लॅक चित्रपटात अमिताभ ज्या पद्धतीने राणी मुखर्जीला स्पर्शाची भाषा शिकवतो. अगदी त्याच पद्धतीने एनीने हेलेनला स्पर्शाची भाषा शिकवली.यानंतर एनीने तिला भाषा शिकवण्यासाठी जिवाचे रान केले. तिला प्रथम हाताने भाषा शिकवत शब्दांचे अर्थ तिला समजावले. यानंतर हेलरच्या मनात नवीन उमेद जागी झाली. हेलरने यानंतर कधीही मागे वळून पाहायचेच नाही हे ठाम केले.तिच्यात एक अशी ऊर्जा निर्माण झाली, की या ऊर्जेने तिला नवीन दृष्टी दिली, आणि ही ऊर्जा होती तिच्या इच्छा शक्तीची. या बळाच्या आधारेच तिने रेडक्लिफ महाविद्यालयातून आपली पदवी मिळवली. या दरम्यान हेलेनचे पहिले पुस्तक 'द स्टोरी ऑफ लाईफ' प्रकाशित झाले. यानंतर याचे जवळपास ५० भाषांमध्ये या पुस्तकाचे भाषांतर करण्यात आले.इथे हेलन यांच्या केवळ इच्छाशक्तीचाच विजय झाला. त्यांनी बालपणातच जर हार मानली असती तर जगाला इतकी प्रतिभाशाली लेखिका मिळालीच नसती. म्हणूनच केवळ इच्छाशक्तीच्या बळावरच आपण विजय मिळवू शकतो हे विसरता कामा नये.

# गौतम बुद्ध यांच्या विचारातील व्यापकता

प्रसाद माधव कुलकर्णी,इचलकरंजी

आज बुद्ध जयंती. त्यानिमित्त...

राजपुत्र गौतमाने समाज जीवनातील दुःख, दैन्य पाहून सत्याचा शोध घेण्यासाठी गृहत्याग केला. माणसाच्या मनात कशाचीही इच्छा, विकार, असूया असता कामा नये. त्याचे हृदय ममत्वाच्या आणि निर्वैराच्या भावनेने व्यापलेले असले पाहिजे. इच्छा, आकांक्षा, भय, आकर्षण या साऱ्या पलीकडे अनिकेत अवस्थेत जगणे महत्त्वाचे आहे. हाच मार्ग माणसाची रोग, वार्धक्य, दुःख आणि मृत्यू यापासून सुटका करू शकेल. अशा विचाराप्रत भवताल पाहून सिद्धार्थ गौतम आले होते. वयाच्या तिशीत गृहत्याग केलेल्या गौतम बुद्धांनी पुढची चाळीस-पन्नास वर्षे आपल्या उक्ती आणि कृतीतून एक मोठी शिकवण दिली. गौतम बुद्धांनी अत्यंत सोप्या भाषेत शिकवण दिली. बुद्धाला सर्वसामान्य लोकांविषयी आस्था व जिव्हाळा वाटत असल्याने ते त्या वेळच्या प्राकृत लोकभाषेतच विचार व्यक्त करत. प्रारंभीच्या काळात म्हणूनच बौद्ध साहित्य हे पाली आणि मागधी भाषेतच तयार झाले. ती सर्वमान्य भाषा असल्याने बुद्धांची शिकवण दूरवर पसरली. बुद्धांचे तत्त्वज्ञान अतिशय व्यापक आहे. माणसाकडे निखळ माणूस म्हणून पाहणारे आहे. म्हणूनच ते नंतर तिबेट, चीन, श्रीलंका, ब्रह्मदेश अशा अनेक देशांमध्ये गेले.

बुद्धांचा उदय झाला त्यावेळी सामाजिक परिस्थितीमध्ये कर्मकांडाचा अतिरेक झालेला होता. चातुवर्ण्य व्यवस्थेच्या मर्यादा स्पष्ट होत होत्या. यज्ञाच्या आधारे पारलौकिक फळे मिळतात यावरील लोकांचा विश्वास डळमळीत होऊ लागलेला होता. बाह्य कर्मकांड यांत्रिक, विचाररहित आणि औपचारिक झालेले होते. कर्मकांडापेक्षा नैतिक सदाचरणाचा, चित्तशुद्धीचा विचार महत्त्वाचा मानला जाऊ लागला होता. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री यांनी म्हटले होते, माणसाला मोक्ष किंवा परम कल्याण देणारी ईश्वरासारखी शक्ती माणसाच्या बाहेर आणि वर आहे आणि माणूस त्याच्यावर अवलंबून आहे. या वेद व उपनिषदांच्या विचारात माणसाची महत्ता कमी होऊन त्याला गौणत्व आले होते. मात्र सांख्यांनी ईश्वराला अमान्य करून अशी शक्ती माणसामध्येच आहे, असे सांगून माणसाची महत्ता आणि उंची वाढवली. माणसाचे ईश्वरावरील किंवा दैवीशक्ती वरील अवलंबन अमान्य करून माणसातील सुक्त सामर्थ्य प्रगट करण्याला मानवाला प्रवृत्त व समर्थ करण्याचे मोठे कार्य बुद्धांनी केले. माणसाच्या अंतिम कल्याणाचे सर्वोच्च माणसातच आहे हे त्यांनी सांगितले.

जीवनातील चार सत्ये-बुद्ध सांगायचे की, माणसाने सर्व प्रकारच्या दुःखांपासून दूर राहिले पाहिजे. बुद्धांनी जीवनातील चार सत्ये सांगितली, जी नेहमी लक्षात ठेवावीत. (अ) जन्म, मृत्यू, रोग, इच्छा वगैरे सर्व दुःख देतात. (ब) कोणत्याही प्रकारची इच्छा सर्व दुःखांचे कारण आहे. (क) इच्छांवर नियंत्रण ठेवले पाहिजे, जेणेकरून आपल्याला दुःख टाळता येईल. (४) सांसारिक दुःख दूर करण्याचे आठ मार्ग आहेत. त्यांना अष्टमार्ग किंवा मध्यम मार्ग असे म्हणतात. मध्यम मार्गाचा अवलंब करून मनुष्य निर्वाण प्राप्त करू शकतो. ते आठ मार्ग म्हणजे (१) सम्यक (शुद्ध) दृष्टी - सत्य, असत्य, पाप-पुण्य इत्यादी समजून घेणे. (२) सम्यक संकल्प - इच्छा आणि हिंसेच्या विचारांचा त्याग करणे. (३) सम्यक वाणी - सत्य बोलणे आणि विनम्र बोलणे. (४) सम्यक कर्म - नेहमी योग्य आणि चांगले कर्म करणे. (५) सम्यक आजीव - उदरनिर्वाहासाठी योग्य मार्गाने पैसे कमवणे. (६)योग्य व्यायाम - वाईट भावना टाळणे (७) योग्य स्मृती - चांगल्या गोष्टींचे आचरण करणे. (८) सम्यक समाधी - एखाद्या विषयावर एकाग्रतेने विचार करणे. ही चार सत्य आणि आठ मार्ग यांचे महत्त्व बुद्ध विचारात मोठे आहे. अनेक शतकांनंतर भारतामध्ये बौद्ध धर्माला नवा उजाळा देण्याचे मोठे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. जातिसंस्थेचा दाह त्यांनी स्वतः सोसला होता. त्यांना स्वतःसह समाजाला त्यातून बाहेर काढायचे होते. धर्मात देव, आत्मा, प्रार्थना, पूजा, कर्मकांड यांना स्थान असून नीतीला स्थान आहे. याउलट नीती हे धम्माचे सार आहे. डॉ. आंबेडकरांनी पारंपरिक बौद्ध धर्माची नव्याने मांडणी केली.

अहिंसेबाबत भाष्य करताना डॉ. आंबेडकर म्हणतात, 'बुद्धाने तत्त्व आणि नियम यात भेद केलेला असल्यामुळे त्याने अहिंसेला नियमाचे रूप दिले नाही. तत्त्वामध्ये तुम्हाला त्यानुसार वर्णन वर्तन करण्याचे स्वातंत्र्य असते, तसे नियमात नसते. नियम तुम्हाला मोडतो अथवा तुम्ही नियमाला मोडता.'

जीवनातील वास्तवानुभव -बुद्धाची धर्मविषयक विचारधारा गूढतेकडे, अतीन्द्रियतेकडे, पारलौकिकतेकडे झुकत नाही, तर मानवी जीवनातील वास्तवानुभव याला प्राधान्य देते. म्हणूनच बुद्धाचा मुख्य हेतू मानवी जीवन शुद्ध आणि सार्थ करणे याला प्राधान्य देतो. सर्व मानव जातीला व्यापून राहण्याची क्षमता बुद्ध विचारात आहे, म्हणूनच तो जगभर पसरू शकला. शक्तीच्या आणि बळाच्या वापराला बुद्ध विचाराला स्थान नाही. तर प्रेमाच्या, मैत्रीच्या आणि करुणेच्या मार्गाने तो पसरलेला आहे. बुद्धाचा सर्वात जास्त विश्वास हा बोधीवर म्हणजेच स्वच्छ आणि स्पष्ट ज्ञान, आकलन यावर आहे. बुद्धाचे तत्त्वज्ञान अत्यंत बारकाईने समजून घेण्याची नितांत गरज आहे. कारण अतींद्रिय व पारलौकिकतेच्या चर्चेपेक्षा प्रत्यक्षानुभव, जीव आणि जीवनविषयक आकलन फार महत्त्वाचे आहे. बुद्ध विचारातील ही व्यापकता जाणून घेतली पाहिजे.

## राशी भविष्य



२५ मे २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व
प्रवासातून चांगले अनुभव आपल्या व्यवसायात बदल करायला लावतील. संततीशी वादाचे प्रसंग येतील.

वृषभ : शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम
मामा, मावशी किंवा सासुरवाडीचे व्यवहार बिघडू देऊ नका. मुलांच्या वागण्याकडे लक्ष ठेवा.

मिथुन : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
जुन्या आठवणी, नव्या मित्रांची संगत यातून भरीव कामगिरी करू शकाल. सासू-सुनांतील दुरावा कमी करा.

कर्क : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर
घरगुती आजारपण, नाराज शेजारी, पाहुण्यांचे मुक्काम आणि स्वत:ची कामाची घाई यातून वेळ काढावा लागेल.

सिंह : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
तब्येतीची प्रसन्न साथ, घरातले मंगल वातावरण, नशीबाची अनुकूल साथ हे सर्व कसे चांगले जमून येणार आहे.

कन्या : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा : उत्तर
अनाठायी खर्च टाळा. खर्च करताना आपण काही अनिष्ट गोष्टींना खतपाणी घालत नाही ना याची काळजी घ्या.

तुळ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
मैत्रिणीसह होणाऱ्या गप्पातून ज्ञानात भर पडेल. काही वैचारिक चर्चा हितकारक ठरतील.

वृश्चिक : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम
आयुष्याला वळण देणारे ठरावेत असे प्रस्ताव आपले उत्पन्नही वाढविणारे ठरतील. वृद्धांच्या तब्येती सांभाळा.

धनु : शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पूर्व
घरात काही मंगलकार्ये ठरतील. कार्यक्रमानिमित्त घरात पाहुण्यांची वर्दळ राहील.

मकर : शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व
घरात कुटुंबियांच्या तब्येती व काही विचित्र प्रश्न यातून सफाईने मार्ग काढावा लागेल.

कुंभ : शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : उत्तर
कोणत्याही वादविवादात मध्यस्थी करू नका. शब्दप्रयोग व पैसा यांचा वापर विचारपूर्वक करा.

मीन: शुभ रंग : लाल, शुभ दिशा : उत्तर
नोकरीच्या अपेक्षा असणाऱ्यांना अपेक्षित अशी नोकरी मिळेल. नोकरदारांना नोकरीतील बदल लाभदायक ठरतील.

२५ मे ला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, बुध व नेपच्यूनचा प्रभाव आहे. तुमची वृत्ती संवेदनाक्षम आहे. कुणाच्या बोलण्याचा तुमच्या मनावर चटकन परिणाम होतो व ती गोष्ट तुम्ही मनाला लावून घेता. तुमची बुध्दी तल्लख आहे. शक्यतो तर्कशुध्द विचारसरणीचाच तुम्ही अवलंब करता पण बऱ्याच वेळा तुमच्या मनावर भावनाविकारांचा पगडा जास्त बसतो. तुम्ही अंत:स्फूर्तीने घेतलेले निर्णय जास्त अचूक ठरतात. तुमच्याकडे असाधारण प्रतिभा व नवनिर्मितीची क्षमता आहे. जीवनात जे गूढ, अतर्क्य आहे त्याचे तुम्हाला आकर्षण वाटते. ज्योतिष, परलोकविद्येचा अभ्यास करता. स्वप्नाळू वृत्तीत रमण्यामुळे वास्तवापासून दूर जाण्याचा धोका आहे. अव्यवहारी वागण्याने तुम्ही स्वत:चे नुकसान करून घ्याल. निसर्गाचा सहवास स्फूर्तिदायक ठरेल. अतिकाळजी, नैराश्य यामुळे निद्रानाश, मनोविकार निर्माण होतील. मादक द्रव्ये, व्यसनांच्या आहारी जाणे टाळा.

कार्यक्षेत्र : लोकांच्या मनाची नाडी अचूक जाणू शकल्याने रेडिओ, दूरदर्शन, नाटक, चित्रपट या माध्यमात लेखन, अभिनय, दिग्दर्शन वगैरे शाखात तुम्ही भरीव कामगिरी करू शकाल. मानसशास्त्रीय समस्यांबाबत मार्गदर्शन करू शकल्याने मानसोपचार, मनोविश्लेषण, व्यवसाय समुपदेशन या क्षेत्रातही लौकिक होऊ शकेल. जलक्रिडेची वा पर्यटनाची विश्रामस्थाने, धर्मादाय संस्था ही क्षेत्रेही अनुकूल आहेत.

प्रणयी जीवन : तुमचा स्वभाव हळवा असल्याने प्रिय असलेल्या व्यक्तीच्या आपल्याबलच्या नेमक्या भावना आधी जाणून घेण्याचा प्रयत्न करा. नाहीतर नकाराचा धक्का सहन करावा लागेल. तुमच्या भावना सखोलपणे समजून घेणाऱ्या समंजस साथीदाराची तुम्हाला गरज आहे. असा जोडीदार जून २१ ते जुलै २० दरम्यानच्या व्यक्तीत सापडेल.

वर्षफळ : समाजकारणी, उद्योगापतींशी घनिष्ट संबंध प्रस्थापित होतील. व्यवसायात कर्तबगारी गाजवण्याच्या संधी येत राहतील. फेब्रुवारी मार्च मध्ये नवे करार होण्याची शक्यता आहे. एप्रिल मे मध्ये आर्थिक प्राप्ती उंचावण्याच्या संधी येतील. जून जुलै मध्ये कुटुंबासह रमणीय ठिकाणी प्रवास होतील. प्रीतीच्या धाग्यांची गुंफण होईल. ऑगस्ट सप्टेंबर मध्ये राजकीय सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा उंचावेल. नोव्हेंबर डिसेंबर मध्ये जागेचे व्यवहार यशस्वी होतील.

महत्वाचे वर्ष : ७, १६, २५, ३४, ४३, ५२, ६१, ७०.

भाग्यरत्न : लसण्या

याच तारेखेची व्यक्ती : रासबिहारी बोस, माया जाधव


हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** **ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




## जयवंत दळवी यांच्या नाटकावर आधारित पुरुष वेबसिरीज लवकरच प्लॅनेट मराठी ओटीटीवर

'पुरुष' ही वेबसिरीज जयवंत दळवी यांच्या नाटकावर आधारित आहे. समाजरचनेतील पुरुषी अहंकार आणि त्यांचे स्त्रियांबद्दलचे विचार तसेच वास्तविक जीवनावर भाष्य करणारी ही वेबसिरीज आहे.

मुंबई : प्लॅनेट मराठी ओटीटी नेहमीच धमाकेदार विषय प्रेक्षकांकरिता घेऊन येतचं असतो . 'रानबाजार'च्या जागतिक यशानंतर आता प्रेक्षकांच्या भेटीला 'पुरुष' ही नवीन वेबसिरीज लवकरच प्लॅनेट मराठी ओटीटीवर झळकणार आहे. नुकतेच प्लॅनेट मराठी ओटीटीच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवर या वेबसिरीजची घोषणा करण्यात आली असून या टीझरला रसिकांनी लाईक्स आणि कंमेंट्सचा वर्षाव केला आहे.




'पुरुष' ही वेबसिरीज जयवंत दळवी यांच्या नाटकावर आधारित आहे. समाजरचनेतील पुरुषी अहंकार आणि त्यांचे स्त्रियांबद्दलचे विचार तसेच वास्तविक जीवनावर भाष्य करणारी ही वेबसिरीज आहे. अक्षय बर्दापूरकर प्रस्तुत आणि अभिजित पानसे, श्रीरंग गोडबोले, प्रसन्न आजरेकर यांनी निर्मिती केली आहे. सचिन खेडेकर, मृण्मयी देशपांडे हे नामवंत कलाकार प्रमुख भूमिकेत दिसणार आहे.

अभिजित पानसे घोषणेबाबत म्हणतात, पुरुष ही वेबसिरीज पुरुष स्त्रियांबद्दल काय विचार करतात. स्त्रियांना माणूस म्हणून नाही तर लैंगिक वस्तू म्हणून पाहिलं जातं. याबद्दल स्त्रियांची प्रतिक्रिया या वेबसिरीजमध्ये पाहण्यासारखी आहे. त्यामुळे ही वेबसिरीज प्रत्येक स्त्री पुरुषाने बघायला हवी.

प्लॅनेट मराठीचे प्रमुख, संस्थापक अक्षय बर्दापूरकर म्हणतात, अभिजित पानसे आणि प्लॅनेट मराठीच घट्ट नातं आहे. त्यांनी केलेली 'रानबाजार' वेबसिरीजला भरघोस यश मिळाल्यानंतर आता 'पुरुष' वेबसिरीज प्लॅनेट मराठीवर घेऊन येत आहोत. रानबाजार बघितल्यावर त्या वेबसिरीजचं कौतुक श्री. शाम बेनेगल, श्री. अमोल पालेकर, श्री. एन. चंद्रा यासारख्या दिग्गज व्यक्तींनी देखील केले आहे.

अभिजित पानसे हे केवळ मराठीतीलच नव्हे तर देशातील एका उत्तम दिग्दर्शकांपैकी एक आहेत. ते कायम वेगळे प्रयोग करत असतात. पुरूष ही वेबसिरीज अशा प्रकारे तुम्हाला पहायला मिळेल की असा प्रयोग जगात पहिल्यांदाच समोर येईल. त्यामुळे ह्या वेबसिरीजला भरभरून प्रतिसाद मिळेल यात शंकाच नाही.

## ऋतुजा बागवे झळकणार मयाफहिंदी मालिकेत; भूमिकेविषयी अभिनेत्रीने केला मोठा खुलासा

**'माटी से बंधी डोर' ही मालिका वैजू या व्यक्तीरेखेची कथा आहे जी शेतात काम करुन आपल्या कुटुंबाला हातभार लावत असते. प्रत्यक्षात तिच्या नशीबात काही औरच लिहिलेले असते.**

मुंबई : स्टार प्लस आपल्या प्रोजेक्ट्सद्वारे प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन करण्याची आ-पली परंपरा कायम ठेवत, पुन्हा एक अनोखी अशी मालिका प्रेक्षकांसमोर आणण्याकरिता सज्ज झाले आहेत. या मालिकेत मराठमोळी अभिनेत्री ऋतुजा बागवे व अंकित गुप्ता मुख्य भूमिकांमध्ये दिसून येणार आहेत. 'माटी से बंधी डोर' असे या मालिकेचे शिर्षक असून या मालिकेत ऋतुजा वैजयंती (वैजू)ची व्यक्तीरेखा साकारत आहे, तर अंकित गुप्ता रणविजयच्या भूमिकेत पहायला मिळणार आहे.'माटी से बंधी डोर' ही मालिका वैजू या व्यक्तीरेखेची कथा आहे जी शेतात काम करुन आपल्या कुटुंबाला हातभार लावत असते. प्रत्यक्षात तिच्या नशीबात काही औरच लिहिलेले असते. वैजूची नाळ जितकी आपल्या कुटुंबासोबत जोडलेली आहे तितकेच घट्ट नाते तिचे आपल्या गावाशीही आहे. त्यामुळे प्रचंड मेहनत करुन या गा-



वाचा कायापालट करायचा हे वैजूचे एकमेव लक्ष्य आहे.नुकतेच मेकर्सनी या शोचा एक जबरदस्त प्रोमो रिलीज केला. यामध्ये प्रेक्षक वैजूला आपल्या स्वप्नातील राजकुमार रणविजयच्या भेटीसाठी प्रतिक्षा करताना पाहू शकतील. प्रेक्षकांना वैजू व रणविजय यांच्यात एक ड्रीम सिक्वेन्सही पहायला मिळेल, ज्यात वैजू रणविजयसोबत रोमँटिक क्षण घालविण्याचे स्वप्न पाहतेय. आपल्या अनोख्या अंदाजात ती रणविजयसोबत आपल्या भावी आयुष्याविषयी बोलते. रणविजयला मात्र तिचे हावभाव विचित्र वाटतात व तो तिला सांगतो की त्याला एका अशा मुलीची लग्न करायचे आहे जी शिकलेली असेल न की एखादी पैलवान. हे ऐकून वैजूचा हृदयभंग होतो. वैजू मात्र कोणत्याही प्रकारचा दिखावा न करता आपल्या भावना मोकळेपणाने व ईमानदारीने व्यक्त करते. आता वैजूसाठी पुढे काय लिहिले असेल? तिचे आपल्या स्वप्ना-तील या राजकुमारासोबत लग्न होईल का? आणि रणविजय तिचा प्रस्ताव स्वीकारेल का? हे पाहणे खूपच मनोरंजक ठरेल. ऋतुजा बागवे आपल्या या मालिकेविषयी आणि प्रोमोविषयी म्हणते, येत्या प्रोमोमध्ये दर्शक वैजूचे ड्रीम सिक्वेन्स पाहतील, जे वैजू व रणविजय यांच्यातील अविस्मरणीय क्षणांपैकी एक असतील. वैजू ही सच्ची प्रामाणिक मुलगी आहे. त्यामुळे जेव्हा ती रणविजयशी बोलते तेव्हा त्याला ती त्याला कोणत्याही दृष्टीकोनातून शिष्ट वाटत नाही व तो सहजपणे तिला पैलवान म्हणतो. त्यामुळे तिला दुःख होते. परंतु ऋतुजाला वैजूला सांगायचे आहे की तिने दुःखी होऊ नये व स्वत:प्रती कायम प्रामाणिक रहावे. कारण जगाला तिच्यासारख्या लोकांची गरज आहे जे ईमानदार असतील न की चालाख. 'माटी से बंधी डोर' ही मालिका येत्या २७ मे पासून स्टार प्लसवर दररोज सोमवार ते रविवार संध्याकाळी ७.३० वाजता प्रसारित होणार आहे.



## 'भाभीजी घर पै है' फेम अभिनेत्याचे निधन, हार्ट अटॅकने घेतला जीव

मुंबई-टीव्ही क्षेत्रातून एक दुःखद बातमी समोर येतेय. भाभीजी घर पै हे मालिकेतील अभिनेता फिरोज खान यांचे निधन झाले आहे. अमिताभ बच्चन यांची मिमिक्री आणि अभिनयामुळे त्यांची विशेष ओळख होती. २३ मेच्या सकाळी बदायू येथे त्यांनी शेवटचा श्वास घेतला. ते बॉलिवूड सुपरस्टार अमिताभ बच्चन यांचे डुप्लीकेट होतेय. यामुळे लोके त्यांना फिरोज खान अमिताभ डुप्लीकेट नावाने हाक मारायचे. टीव्ही अभिनेत्याच्या मृत्यूमुळे त्यांचे चाहते, टीव्ही इंडस्ट्री आणि कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे.


अभिनेता फिरोज खान यांनी केवळ मालिकांमध्येच नव्हे तर सिने क्षेत्रातही आपली ओळख बनवली होती. बॉलिवूड महानायक अमिताभ बच्चन यांचे डुप्लीकेट बनून त्यांनी काही सिनेमांमध्ये काम केले. २३ मे रोजी उत्तर प्रदेशच्या बदायूमध्ये त्यांचा मृत्यू झाला. अमिताभ यांचे डुप्लीकेट फिरोज खान यांनी अनेक टीव्ही मालिका आणि सिनेमांमध्ये काम केलंय. भाभीजी घर पे है, जीजी जी छत पर है, साहब बीबी और बॉस, हप्पू की उल्टन पल्टन आणि शक्तिमान या मालिकेत त्यांनी काम केलेय. गायक अदनान सामी यांच्या थोडी सी तो लिफ्ट करा दे मध्ये ते झळकले होतेय. काही दिवसांपासून ते यूपीच्या बदायू येथे इव्हेंट्सच्या कामासाठी आले होते.

फिरोज खान यांनी ४ मेला बदायू क्लबमध्ये मतदाता महोत्सवात आपला शेवटचा परफॉर्मन्स दिला होता. जो लोकांना खूप आवडला. फिरोज खान सोशल मीडियात खूप ॲक्टीव्ह असायचे. त्यांनी अमिताभ याच्यासहित दिलीप कुमार, शाहरुख खान, धर्मेद्र आणि सनी देओल यांच्यासह अनेक सिने कलाकारांची मिमिक्री केली.

## रश्मिकाकडून अटल सेतूचे कौतुक; आदित्य ठाकरेंकडून कानपिचक्या,म्हणाले, आधी सत्याची पडताळणी करा..

मुंबई-प्रसिद्ध अभिनेत्री रश्मिका मंदाना हिचा एक व्हिडिओ काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. मुंबईतील अटल सेतूवर रश्मिकाने हा व्हिडिओ शूट केला होता. या व्हिडिओमध्ये तिने पंतप्रधान मोदी आणि अटल सेतूचं कौतुक केल्याचं पाहायला मिळालं आहे. पण यावर ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी रिट्विट करत काही गोष्टी मांडल्या. रश्मिकाच्या या व्हिडिओमुळे तिला मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आलं. त्यावर आदित्य ठाकरेंच्या ट्विटमुळेही बरीच खळबळ माजली.

दरम्यान रश्मिकाने हा व्हिडिओ पोस्ट केल्यानंतर त्यावर अनेकांनी कमेंट करत तिला ट्रोल केल्याचं पाहायला मिळालं. त्यातच आदित्य ठाकरेंच्या ट्विटमुळेही या व्हिडिओची बरीच चर्चा झाली. या व्हिडिओमध्ये रश्मिकाने अटल सेतूविषयी माहित दे शेवटी विकासाला मत द्या असं आवाहन लोकांना केले आहे. त्यामुळे रश्मिकाचे चाह-तेही तिच्यावर नाराज झाल्याचं पाहायला मिळत आहे. अनेकांनी कमेंट करत रश्मिकावर नाराजी देखील व्यक्त केली आहे. एकाने कमेंट करत म्हटले की, 'ॲनिमल



सारखा चित्रपट बनव आम्ही तो हिट करू पण अशा जाहिराती करू नको' तर दुसऱ्याने कमेंट करत म्हटलं की, 'प्रिय रश्मिका पूल आणि मूर्ती यांच्यावर व्हिडिओ बनवतेस तसं मणिपूर मध्ये झालेल्या हिंसेप्रकरणी सुद्धा आम्हाला तुझा व्हिडिओ पाहायला आवडेल. की मणिपूरला भारताचा भाग कसं बनवता येईल.'रश्मिकाच्या या व्हिडिओवर आदित्य ठाकरेंनीही पोस्ट केली आहे. त्यावर आदित्य ठाकरेंनी म्हटलं की, मी नुकतच एका अभिनेत्रीला अटल सेतूची जाहिरात करताना पाहिले (यासाठी पैसे दिलेही असतील कदाचित) मुंबई ट्रान्स हार्बर लिंक हा सध्याच्या राजवटीमध्ये अटल सेतू म्हणून ओळखला जातो. यामध्ये काही गोष्टी मिसिंग आहेत. अटल सेतू- श्ऊप्थ चे ८५म काम जून २०२२ पर्यत पूर्ण झाले होते, जेव्हा आमचे सरकार पाडण्यात आले होते. हे काम महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये करण्यात आले होते. भाजपच्या नेतृत्वाखालील खोके सरकारने २०२२ ते २०२४ पर्यत उर्वरित १५म पूर्ण करण्यासाठी आणि नंतर उद्घाटनाला हेतुपुरस्कार उशीर केला.'पुढे आदित्य ठाकरेंनी म्हटले की, 'भाजपच्या नेतृत्वाखालील मिंधे राजवटीने चढहङ चे उद्घाटन पूर्णत: तयार झाल्यानंतर ३ महिन्यांनी केले कारण त्यांना विआयपी उद्घाटनाच्या तारखा मिळाल्या नाहीत- मुंबईची प्रगती रोख-ून धरली. शेवटी ही अभिनेत्री म्हणते की जागे व्हा आणि विकासाला मत द्या, म्हणजेच भाजपाला मत देऊ नका असा याचा अर्थ होतो. अशा जाहिराती करणाऱ्या सर्वांना एक नम्र विनंती- कृपया चित्रीकरण करण्यापूर्वी वस्तुस्थिती तपासा. काही पक्षांना 'वार रुकवा दी' सारख्या जाहिराती करण्यासाठी कलाकार मिळत आहेत.'


## ऐश्वर्या राय बच्चन मुलगी आराध्यासह कानमधून मुंबईत परतली, व्हिडिओ व्हायरल

मुंबई-७७ व्या कान फिल्म फेस्टिव्हलमध्ये हजेरी लावल्यानंतर बॉलिवूडची सुंदर अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन मुंबईत परतली आहे. आज १९ मे रोजी सकाळी मुंबई विमान-तळावरुन बाहेर येत असताना तिने सुंदर किलर स्माईल देऊन सर्वांची मने जिंकली. यावेळी ऐश्वर्याने काळ्या-पांढरा रंगाचा ड्रेस परिधान केला. यात ती खूप देखणी दिसत होती. याशिवाय दुसरीकडे आराध्याने पांढऱ्या रंगाचे स्वेटशर्ट आणि निळी पॅन्ट परिधान केली. यात ती सुंदर दिसत होती. विमानतळावर ऐश्वर्या आणि आराध्या यांनी पापाराझीला गोड अशी स्माईल दिली. आता सोशल मीडियावर त्यांचे काही व्हिडिओ व्हायरल होत आहेत.कान फिल्म फेस्टिव्हलमधील ऐश्वर्याचे लूक : ऐश्वर्याने कान फिल्म फेस्टिव्हलमध्ये आपल्या लूकनं तिच्या चाहत्यांना घायाळ केले. काळ्या आणि सोनेरी रंगाच्या स्ट्रॅपलेस गाऊनपासून ते फाल्गुनी आणि शेन पीकॉक यांनी डिझाइन केलेल्या निळ्या आणि चांदीच्या पोशाखापर्यतचा ऐश्वर्याचा स्टायलिश लूक हा अनेकांना आवडला होता. कान फिल्म फेस्टिवलमध्ये ऐश्वर्याने २००२ मध्ये पदार्पण केले होते. ती कान फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'देवदास'च्या प्रीमियरसाठी शाहरुख खान आणि दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांच्याबरोबर गेली होती. तेव्हापासून, ऐश्वर्या या कार्यक्रमाला हजेरी लावत आहे. तिला 'कान क्वीन' ही पदवी मिळली आहे.ऐश्वर्या रायचे कान फिल्म फेस्टिव्हलमधील पदार्पण : गेल्या काही वर्षात ऐश्वर्याने रेड कार्पेटवरच स्थान मिळवले नाही, तर ज्युरी सदस्य म्हणू-नही काम केले आहे. पारंपारिक भारतीय कपड्यांपासून ते बोल्ड लूकपर्यत सर्व पोशाखात ऐश्वर्या खूप खास दिसते. कान फिल्म फेस्टिव्हल ७७ हा २५ मे रोजी संपत आहे. आता सोहळ्यात अनेकजण हजेरी लावताना दिसत आहेत. कान फिल्म फेस्टिव्हलमध्ये कियारा अडवाणी देखील आपल्या सुंदरतेने चाहत्यांची मने जिंकली आहेत. तिचे देखील सोशल मीडियावर फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. दरम्यान ऐश्वर्याच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर ती शेवटी, 'पोनियिन सेल्वन २' या चित्रपटामध्ये दिसली होती. आता पुढे ती 'गुलाब जामुन' या चित्रपटात दिसणार आहे.

## बिग बॉस मराठीच्या चाहत्यांसाठी खुशखबर! सीझन ५ ची केली घोषणा

मुंबई -हिंदीत सुरु झालेल्या 'बिग बॉस' या रिॲलिटी शोचा एक मोठा चाहतावर्ग मराठीत देखील आहे. वेगवेगळ्या प्रादेशिक भाषांमध्ये बिग बॉस मोठ्या प्रमाणावर पाहिले जाते. मराठीत याचे चारही सीझन हिट ठरले. कलाकार, त्यांची भांडणे, त्यांच्यातल्या स्पर्धा या सगळ्यामुळे रंगत आणणारा हा शो प्रेक्षकांना प्रचंड आवडतो. गेल्या अनेक दिवसांपासून चाहते बिग बॉस परत कधी सुरु होणार याची वाट पाहत होते. अखेर ही प्रतिक्षा संपली असून कलर्स मराठीने बिग बॉस मराठीच्या सीझन ५ ची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे यंदा चारही सीझन गाजवणारे अभिनेते व दिग्दर्शक महेश मांजरेकर सूत्रसंचालन करणार नाहीत. तर सगळ्यांचा लाडका असा लयभारी अभिनेता, अख्ख्या महाराष्ट्राला ज्याने वेड लावले तो रितेश देशमुख यंदा सूत्रसंचालनाची जबाबदारी सांभाळणार आहे.

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस



# राष्ट्रवादी युवक कॉग्रेसच्या जिल्हा सरचिटणीपदी सोमेश्वर शेटे यांची निवड

चाकुर / प्रतिनिधी-चाकुर शहरातील युवकांचे संघटन कौशले असणारे सोमेश्र्वर दयासागर शेटे चाकुर यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार साहेब गट लातूर जिल्हा युवक सरचिटणीस पदी निवड झाली.लातुर जिल्ह्यात युवकांचे मोठे संघटन करून युवकांच्या सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,कार्यत योग्य समन्वय साधुन काम करणार आहेत.

येणाऱ्या काळा शरदचंद्र पवार यांच्या विचार सर्वसामान्य जनते पर्यंत पोहचविण्यासाठी जिल्ह्यात काम करणार आहे.यावेळी उपस्थित ज्येष्ठ नेते प्रदेशअध्यक्ष महाराष्ट्र बसवराज पाटील नांगराळकर, लातूर जिल्हाअध्यक्ष संजय शेटे,लातूर युवक जिल्हा म अध्यक्ष भरत सूर्यवंशी,चाकुर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती नीलकंठ मिरकले बाळासाहेब धुप्पे पाटील,सोमेश्र्वर कदम,ज्ञानेश्र्वर पाटील व इतर सर्व पक्ष्याचे मान्यवर यांच्या हस्ते पदभार देण्यात आला

# ऐतिहासिक शोभायात्रा ठरली लक्षवेधी

जालना,२४ - राधे कृष्णा,,, राधे कृष्णा,,,, राधे,,,..ज्ञानोबा ,,,माऊली तुकाराम..., मुखात हरिनामाचा गजर, हाती टाळ, मृदुंग ढोल - ताशे, बँड बाजा, शहनाई चे सुमधुर संगीत, भजन, भारूडे, गवळणींवर थिरकणारी पावले,टाळकरी, डोक्यावर मंगल कलश घेतलेल्या महिला, भगवान श्रीकृष्ण आणि श्रीमद् भगवदगीता, घोडे बग्गीत विराजमान राधा कृष्ण, शिव- पार्वती, विठ्ठल- रुक्मिणी, भक्ती गीतांवर ठेका धरणारे बालकांपासून ते आबालवृद्ध अशा प्रचंड उत्साह व रोमांच पुर्ण वातावरणात जालनेकरांनी शुक्रवार (ता.२४) ची सकाळ वेगळ्या पद्धतीने अनुभवली.प.पू.जया किशोरीजी यांच्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्या निमीत्ताने काढण्यात आलेली ऐतिहासिक, संगीतमय शोभायात्रा शहरवासीयांसाठी लक्षवेधी ठरली, भगवंताच्या नामाने बाजार पेठे सह संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

हरे कृष्णा सत्संग समितीच्यावतीने गायत्री मंदिर परिसरात आंतरराष्ट्रीय आध्यात्मिक कथाकार परम पूज्य जया किशोरी जी यांच्या यांच्या सुमधुर वाणीतून श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा आजपासून प्रारंभ झाला. या अनुषंगाने सकाळी बडी सडक स्थित श्री राम मंदिर येथे कथा समिती अध्यक्ष घनश्याम गोयल , भक्तमाल कथा प्रवक्ता किशोरजी तिवारी, मुख्य यजमान राजेंद्र भारूका,दिनेश भारूका, कार्याध्यक्ष सुभाषचंद्र देवीदान, महासचिव विजय राठी,गौतमसिंह मुनोत, कोषाध्यक्ष सी. ए. गोविंद प्रसाद मुंदडा,मेघराज चौधरी, अंकुशराव राऊत,मनीष तवरावाला, विष्णू पाचफुले, अभय कुलकर्णी ,अनिल सोनी, पवन जोशी,रामनिवास गौड ,पुरुषोत्तम जयपुरिया ,दिलीप शाह,मनोज दायमा, रामेश्वर जोशी,रवींद्र अबोटी,दीपक अंभोरे ,सुनील बियाणी, राजेश कामड,आदींच्या हस्ते श्रीमद्भगवद्गीता ग्रंथाचे विधिवत पूजन करण्यात आले. प.पू.मनोज महाराज गौड यांनी वेदमंत्रोच्चारात पौरोहित्य केले

श्रीराम मंदिर येथून शोभा यात्रेस प्रारंभ झाला. शोभा यात्रेत घोड्यावर स्वार, छत्रपती शिवाजी म हाराज, भगवे ध्वज धारी, भजनी मंडळाचे वारकरी , टाळकरी व महिलांनी एकसुरात , लयबद्ध भजने, गीते गायिली,समिती सदस्यांसह महिलांनी टाळ- मृदंगाच्या गजरात ठेका धरत फुगड्या खेळण्याचा आनंद लुटला. शोभायात्रा मार्गावर भाविकांनी सडा -रांगोळी काढून ग्रंथाचे दर्शन घेतले. तसेच चौका-चौकात शोभा यात्रेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. शिवाय सहभागी भाविकांसाठी चहापाणी, फराळ, अशी व्यवस्था जे. पी. सी.बँक, मोतीराम अग्रवाल जालना मर्चट को-ऑपरेटिव्ह बँकेसह भाविकांनी केली होती. टांगा स्टॅन्ड, दाना बाजार, सिंधी बाजार, बालाजी गल्ली, शोला चौक ,नर -नारायण मंदिर मार्गे जात श्रीराम मंदिर येथे शोभा यात्रा विसर्जित झाली.

# लातूर कॉलेज ऑफ सायन्स महाविद्यालयाचा १०० टक्के निकाल





लातूर / प्रतिनिधी- माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ बारावी बोर्ड परीक्षेत श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ सायन्स ने यशाची परंपरा कायम राखली आहे. विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून १० विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम क्रमांक अंकुर महादेव बंडगर ६८.७१, द्वितीय क्रमांक मानसी बालाजी थोरमोठे ६७.१७, तृतीय क्रमांक भक्ती कल्याणराव देशपांडे ६१.६७ गुण घेऊन महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम राखली आहे .या गुणवंत विद्यार्थ्याचे संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे ,सचिव वेताळेश्वर बावगे, कोषाध्यक्ष शिवलिंग जेवळे, संचालक नंदकिशोर बावगे ,संचालिका सौ माधुरी बावगे प्राचार्य राजशेखर चौधरी,प्रा. शुभम वैरागकर प्रा.प्रज्ञा वागदरे ,प्रा. हर्षदा नलगे प्रा.योगेश कवळीकर, प्रा. नौशाद पटेल ,प्रा. स्नेहा तरकसे, प्रा.परमेश्वर बिराजदार ग्रंथपाल ज्ञानेश्वर कांबळे, आदीसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले आहे.

# प्रवरा नदीपात्रात बचाव दलाच्या तीन जणांना वीरमरण

मुंबई,२४ - अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात सुगाव बु. येथे प्रवरा नदीपात्रामध्ये दोन मुले बुडाली असल्यामुळे महसूल व वनविभाग मंत्रालय यांच्या आदेशान्वये घटनास्थळावर शोध व बचाव कार्य करण्यासाठी राज्य राखीव पोलीस बलाअंतर्गत असलेल्या राज्य आपत्ती प्रतिसाद दल, धुळे येथील एक बचाव तुकडी दि.२२.०५.२०२४ रोजी १९.४४ वाजता रवाना करण्यात आली होती.

ही तुकडी घटनास्थळी पोहचून दिनांक २३.०५.२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजता अतिशय शौर्याने शोध व बचाव कार्य करतेवेळी नदी पात्रामधील पाण्याचा विसर्ग वाढल्यामुळे पाण्याचा तीव्रवेग व पाणी उसळी खात असल्यामुळे बोट पाण्याच्या भोवऱ्यात उलटून दुर्देवी घटना घडली. त्यात १ पोलीस अधिकारी व ४ पोलीस अंमलदार हे पाण्याच्या प्रवाहात अडकले, त्यामध्ये पोलीस उपनिरीक्षक प्रकाश नाना शिंदे, सपोशि०३ वैभव सुनिल वाघ आणि पोशि २८६ राहुल गोपिचंद पावरा यांना वीरमरण आले. तसेच दुर्घटनाग्रस्त बोटीमधील २ पोलीस अंमलदार यांना वाचवण्यात यश आले, अशी माहिती अतिरिक्त पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस दल यांनी दिली आहे.

या घटनेची माहिती प्राप्त होताच महसूल मंत्री व अहमदनगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, आमदार किरण लहामटे, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, राज्य राखीव पोलीस बलाचे अपर पोलीस महासंचालक चिरंजीव प्रसाद, व स्थानिक प्रशासकीय अधिकारी यांनी घटनास्थळी भेट दिली व वीरमरण आले.

# निवड होऊनही शेकडो शिक्षक नियुक्तीच्या प्रतीक्षेत

नागपूर, - डी.एड., बी.एड.ची पदवी घेऊन वर्षानुवर्षे खाजगी शैक्षणिक संस्थांम ध्ये तुटपुंज्या वेतनावर शिक्षक म्हणून नोकरी करणाऱ्या हजारो उमेदवारांना अखेर फेब्रुवारी महिन्यात पवित्र पोर्टलच्या माध्यम ातून निवड यादीत स्थान मिळाले. यातील बहुतांश शिक्षक शाळांमध्ये सेवेत रुजूही झाले. मात्र, रयत शिक्षण संस्थेत निवड झालेल्या ६४५ उमेदवारांच्या कागदपत्रांची अद्याप पडताळणीही झालेली नाही. गुणवत्ता यादीत येऊन जर नियुक्ती रखडली असेल तर यात आमचा दोष काय? असा प्रश्न करत उमेदवारांच्या शिष्टमंडळाने शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांना निवेदन देऊन तातडीने मार्ग काढण्याची मागणी केली आहे.

२०१७ नंतर तब्बल सात वर्षांनी होऊ घातलेली शिक्षक भरती अनेक अडचणींचा सामना करत फेब्रुवारी २०२४ मध्ये निवड याद्या लागून अंतिम टप्प्यात आली. मटीएआयटीफ परीक्षेमध्ये सर्वात जास्त गुण मिळवणारे ६४५ भावी शिक्षक रयत शिक्षण संस्थेमध्ये निवडले गेले. परंतु, निवड याद्या जाहीर होण्याअगोदरच रयत संस्थेतील शिक्षक भरतीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने स्थगिती आणल्याने उमेदवारांच्या पदरी निराशाच आली.

चार महिने उलटून गेले तरीही न्यायालयीन प्रक्रिया पुढे जाण्याचे चिन्ह नाहीत. निवड झालेल्या उमेदवारांनी याआधीही आयुक्तांना दोनदा निवेदन दिले आहे. परंतु प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याचे कारण देण्यात आले. त्यांच्यासोबत इतर शाळांमध्ये निवड झालेले उमेदवार सेवेत रुजू झाले असताना रयत शिक्षण संस्थेत निवड झालेले उमेदवार अद्यापही प्रतीक्षेतच आहेत.

या आहेत मागण्या

रयत शिक्षण संस्थेत निवड झालेल्या उमेदवारांना पुढील शैक्षणिक सत्र सुरू होण्याच्या आत कागदपत्रे पडताळणी व नियुक्तीसाठी आयुक्त स्तरावरून प्रयत्न करावेत. नियुक्तीसाठी आवश्यक ती कार्यवाही आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात यावी. आयुक्त कार्यालयाद्वारे नियुक्ती संदर्भात होत असलेल्या विलंबाबाबत प्रसिद्धीपत्र काढून उमेदवारांचा संभ्रम दूर करावा. सदर नियुक्ती प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय पुढील गुणवत्ता फेरी व यादी जाहीर करण्यात येऊ नये. आतापर्यंत ४ हजार ४७४ उमेदवारांना नियुक्तिपत्र शिक्षण विभागातर्फे पवित्र संकेतस्थळामार्फत राबवण्यात येत असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत आतापर्यत ४ हजार ४७४ उमेदवारांना नियुक्तिपत्र देण्यात आले आहे. त्यातील ४ हजार ९३ उमेदवार प्रत्यक्ष रुजू झाले आहेत. आता उर्वरित शिक्षक भरतीसंदर्भातील प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था आणि मुलाखतीशिवाय शिफारशीचा पर्याय निवडलेल्या व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये ११ हजार उमेदवारांची शिफारस फेब्रुवारीमध्ये करण्यात आली. त्यानंतर उमेदवारांना नियुक्ती देण्याची प्रक्रिया सुरू झाली. मात्र, लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यामुळे निवड झालेल्या शिक्षकांना नियुक्ती देण्याची प्रक्रिया थांबली होती. मात्र, शिक्षण विभागाने भरतीबाबत निवडणूक आयोगाला प्रस्ताव दिला होता. त्यानुसार आयोगाने मतदान झालेल्या जिल्ह्यांत शिक्षकांची नियुक्ती प्रक्रिया करण्यास परवानगी दिली. आता विधान परिषदेतील पदवीधर, शिक्षक मतदारसंघाची निवडणूक जाहीर झाल्याने पुन्हा नियुक्ती प्रक्रिया आणखी पुढे ढकलली जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, आता निवडणूक आयोगाने शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक स्थगित करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे जिल्ह्यांनी निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश शिक्षण विभागाने दिले आहेत.

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३६५/२०२४ निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Vankatrao Vitthalrao Parge हे दि.०२/१२/२०१२ रोजी व अर्जदाराची आई नामे Radhabai Vankatrao Parge हे दिनांक ३१/०३/२००४ रोजी दोघे Ghonsi Tq.Jalkot Dist. Latur, येथे मयत झाले आहेत. व अर्जदार Arvind S/o Vankatrao Parge Age 70 Yrs, Occu. Agri, R/o Ghonsi Tq. Jalkot Dist. Latur यांनी खालील नमुद ४ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असुन,

| Sr.no | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 01 | Chandrashekhar S/o Vankatrao Parge | 75 | Son |
| 02 | Arvind S/o Vankatrao Parge | 70 | Son |
| 03 | Lalita W/o Ramrao Momale | 72 | Daughter |
| 04 | Daishala W/o Govindrao Chewale | 68 | Daughter |

अर्जदार याने Vankatrao Vitthalrao Parge व Radhabai Vankatrao Parge या मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहु वारसदार सदरहु मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु Vankatrao Vitthalrao Parge व Radhabai Vankatrao Parge यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०१/०७/२०२४

(संतोष डी. शिंदे)
कनिष्ठ लिपीक
सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

(एस.एम.शेटे)
सहायक अधिक्षक
सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

## Change of Name

I have changed my name from SHAIKH MOHD KALIM MOHA KHJA TO SHAIKH MOHD KALEEM MOHD KHAJA Hence for this Declaration and will be known by this Name I will Use SHAIKH MOHD KALEEM MOHD KHAJA In Future the same name will be used by my family and relatives.

Old Name :- SHAIKH MOHD KALIM MOHA KHJA

New Name :- SHAIKH MOHD KALEEM MOHD KHAJA

## PUBLIC DISCLOSURE (Name Change)

By this disclosure it is announced that my documentary name is. SYED NASIBODDIN ABDUL RAUFSAB JAGIRDAR .My other documentary name is , next i will use this SAYYED NASIBODDIN ABDUL RAUFSAB JAGIRDAR name is, SYED NASIBODDIN ABDUL RAUFSAB JAGIRDAR , in my pravite and legal practice. Relatives should note this.

Old Name:- SAYYED NASIBODDIN ABDUL RAUFSAB JAGIRDAR

New Name:- SYED NASIBODDIN ABDUL RAUFSAB JAGIRDAR

Address:- AT KALEGAON POST AHMEDPUR Latur 413515

## जाहीर प्रगटन (नावात बदल)

या प्रगटनद्वारेजाहीर करण्यात येतेकी माझ्या कागदोपात्रावर नाव SYED NASIBODDIN ABDUL RAUFSAB JAGIRDAR माझ्या इतर कागदोपात्रीवर माझेनाव SAYYED NASIBODDIN ABDUL RAUFSAB JAGIRDARआहे. यापुढील माझ्या खाजगी व कायदेशीर व्यवहारात माझेहेच नवीन SYED NASIBODDIN ABDUL RAUFSAB JAGIRDAR घेईन . याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

जुनेनाव:-SAYYED NASIBODDIN ABDUL RAUFSAB JAGIRDAR

नवीन नाव :- SYED NASIBODDIN ABDUL RAUFSAB JAGIRDAR

Address :- AT KALEGAON POST AHMADPUR Dist Latur 413515

# दुष्काळाबद्दल शिंदे-भाजपा सरकार गंभीर नाही

मुंबई, - राज्यात दुष्काळाची स्थिती अत्यंत गंभीर आहे, काही गावांना महिना महिना पाणी मिळत नाही, जनावरांना चारा नाही, पिण्याचे पाणी नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये दुष्काळ आढावा बैठक घेतली पण या बैठकीला ५ पालकमंत्री गैरहजर होते यातूनच सरकार दुष्काळावर गंभीर नाही हे स्पष्ट दिसते. मुख्यमंर्त्यांनी जागेवरच आदेश द्यायला पाहिजे होते पण केवळ बैठकीचा सोपस्कार पूर्ण केला. सरकारने आचार संहितेचे बहाणे करुन टाळाटाळ करू नये, तातडीने जनावरांना चारा, पिण्याचे पाणी व लोकांच्या हाताला काम उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, राज्यातील सरकार हे असंवैधानिक आहे, या सरकारला सर्वसामान्य जनतेचे काहीही देणेघेणे नाही. गरीब लोकांचे जीव जात आहेत पण त्याकडे सरकारचे लक्ष नाही. दुष्काळाने जनता होरपळत आहे पण सरकार काहीही उपाययोजना करत नाही. पुण्यात धनदांडग्याच्या मुलाने गरिबाच्या दोघांना चिरडले तर निबंध लिहून त्याला सोडून दिले. डोंबिवलीत रासायनिक कारखान्यात स्फोट होऊन ११ लोकांचा मृत्यू झाला व ६० जण जखमी झाले. डोंबवलीत यापूर्वी झालेल्या एका घटनेनंतर महाविकास आघाडी सरकारने हे कारखाने बंद करण्याचे आदेश दिले होते पण त्यानंतर आलेल्या महाभ्रष्ट युती सरकारने पैसे घेऊन ते कारखाने सुरुच ठेवले. लोकांच्या जिविताचे रक्षण करण्याची जबाबदारी सरकारची आहे पण खोके सरकारला गरिबांच्या जीवाचे मोल नाही, जनाची नाही मनाची असेल तर शिंदे-भाजपा सरकारने राजीनामा देऊन मोकळे व्हावे, असे नाना पटोले म्हणाले.

नवीन अभ्यासक्रमासंदर्भात पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, अभ्यासक्रमात जर मनुस्मृतीचा समावेश केला तर ते अजिबात चालणार नाही, काँग्रेस ते कदापी खपवून घेणार नाही. सर्व तपासून यासंदर्भात पुढची पाऊले उचलू, असे नाना पटोले म्हणाले.

## तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय

(दंडणिय विभाग)

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२४/०५/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार चव्हाण सुषमा नारायण रा.मादलापूर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक २८/०९/१९९९ रोजी मौजे मादलापूर ता. उदगीर येथे झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार चव्हाण सुषमा नारायण रा. मादलापूर ता.उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक २८/०९/१९९९ रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २४/०५/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक २८/०९/१९९९ रोजी मौजे मादलापूर ता. उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार चव्हाण सुषमा नारायण रा. मादलापूर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक २८/०९/१९९९ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय मादलापूर ता.उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २४/०५/२०२४ रोजी दिले.

पूढे नेमलेली तारीख २५/०६/२०२४


तालूका दंडाधिकारी तथा,
तहसीलदार उदगीर





उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो




उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# वाढत्या तापमानामुळे विजेच्या मागणीत विक्रमी वाढ

## महावितरणला फुटला घाम

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून राज्यामध्ये उष्णतेची लाट आली आहे. उष्णतेच्या झळा सोसाव्या लागत असल्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. अशातच वाढत्या उष्णतेमुळे पंखा, एसी या विद्युत उपकरणांचा वापर वाढला असून विजेची मागणी मोठ्या प्रमाणात होत आहे. कमी पडलेला पाऊस आणि विजेची वाढलेली मागणी याचा फटका आता राज्याला बसणार आहे. त्यामुळे राज्यावर सध्या लोडशेडिंगचे संकट घोंघावत आहे.

महावितरणच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात अनेक ठिकाणी उष्णतेचा पारा ४३ ते ४४ अंशाच्या पलीकडे जात आहे. त्यातच विद्युत उपकरणांचा वापर प्रचंड वाढला आहे. यामुळे विजेच्या मागणीत वाढ होत असली तरीही विजेची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी महावितरण अन्य वीज कंपन्यांकडून वीज खरेदी करून महाराष्ट्राची विजेची गरज भागवत आहे. काल महावितरणाने २३ हजार ५७१ मेगावॅट इतका विक्रमी वीज पुरवठा केला. मात्र सातत्याने तापमानात वाढ होत असल्यामुळे वीज मागणी २४ हजार मेगावॅटच्या घरात जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीसांचे कडक लक्ष

ग्रामीण भागातही वातानुकूलित यंत्रांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्यामुळे विजेची मागणी वाढत आहे. वाढत्या मागणीमुळे वीज टंचाई निर्माण होऊ नये म्हणून ऊर्जामंत्री देवेंद्र फडवणीस यांनी याप्रकरणी कडक लक्ष ठेवले आहे. ते अधिकाऱ्यांना वारंवार सूचना देऊन वीज पुरवठ्याची काळजी घेत आहेत, अशी माहिती महावितरणचे अधिकारी यांनी दिली.

# राज्यात ११ जण बुडाले

मंचर(पुणे/सिंधुदुर्ग : पाण्यात जाणा-यांसाठी हा आठवडा धोक्याचा ठरला आहे. २ दिवसांपूर्वी उजनी जलाशयात बोट उलटून ६ प्रवासी गेले तर त्यानंतर नगरमध्ये ४ जण बुडाल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. त्यात आता आणखी भर पडली आहे. कारण सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले बंदरात सुद्धा बोट पलटी झाल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. मच्छिमार बोटींना लागणारा बर्फ घेऊन जात असलेली बोट उलटल्याने ७ खलाशी बुडाले. यातील तिघांनी पोहून किनारा गाठला तर बाकीच्यांचा शोध सुरू आहे. तर पुण्यातील आंबेगावात शेततळ्यात पोहण्यासाठी गेलेल्या चार मुलांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

निरगुडसर (ता. आंबेगाव) येथे दुपारी साडेतीन वाजता घडली. श्रद्धा काळू नवले (१३),सायली काळू नवले (११), दीपक दत्ता मधे (७) राधिका नितीन केदारी (१४) अशी पाण्यात बुडून मरण पावलेल्या मुलांची नावे आहेत. मूळचे जवळे बाळेश्र्वर (संगमनेर)येथील कामगार गोरक्षनाथ बबन कवठे हे पत्नी ज्योती, दत्तक मुली श्रद्धा काळू नवले व सायली काळू नवले यांच्यासमवेत निरगुडसर येथे राहून मजुरीचे काम करत होते. तर मूळचे कानेवाडी(ता. खेड) येथील तीन कुटुंब कामासाठी निरगुडसर येथे आले सर्वजण पोंदेवाडी येथे शेतात काम करण्यासाठी गेले होते. मुले दीपक मध्ये व राधिका केदारी हे घरीच होते. दुपारी श्रद्धा नवले, सायली नवले, दीपक मधे, राधिका केदारी हे चौघे पोहण्यासाठी नजीक असलेल्या शेततळ्यात गेले. शेततळ्यात पाच ते सात फूट पाणी होते. पोहत असतानाच चौघांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. मागील दोन दिवसांपासून सिंधुदुर्गात वादळी वा-यासह मुसळधार पाऊस पडत आहे. त्याच दरम्यान काल रात्री वेंगुर्ले बंदरात मच्छिमार बोटींना लागणारा बर्फ घेऊन बोट घेऊन जात असताना अचानकपणे ती बोट उलटली. या बोटीमध्ये एकूण सात खलाशी होते. बोट पलटी झाल्यानंतर तीन जणांनी पोहत पोहत किनारपट्टी गाठली मात्र बाकीचे ४ जण मात्र बेपत्ता झाले. यातील २ जणांचे मृतदेह सापडले तर दोघांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. अचानक घडलेल्या या घटनेने संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. रात्री ढगांचा गडगडाट, जोरदार वादळी वा-यामुळे ही बोट भरकटली असावी असा प्राथमिक अंदाज आहे. बेपत्ता असलेल्या खलाशांपैकी एक खलाशी रत्नागिरीतील तर तीन खलाशी मध्य प्रदेशातील असल्याचे समजते. अन्य होड्यांमधून त्या खलाशांना वाचविण्यासाठी शोध कार्य सुरू झाले.

राज्यात आतापर्यंत ६ मोठ्या घटना मागील ३ दिवसांत बोट बुडाल्याची ही तिसरी घटना असून बुडून मृत्यूच्या राज्यात ६ मोठ्या घटना घडल्या आहेत.

## मुख्य निवडणूक आयुक्तांचा खून करण्याची धमकी

बुलडाणा : मागच्या काही वर्षांपासून भारतातील ईव्हीएम यंत्रणेबाबत प्रश्र्न उपस्थित केले जात आहेत. देशाच्या निवडणूक आयोगाकडे कायम संशयाच्या नजरेने बघितले जात आहे. त्यातच माजी मंत्री सुबोध सावजी यांनी केलेल्या विधानामुळे आश्र्चर्य व्यक्त होत आहे. ईव्हीएममध्ये घोटाळा झाला तर मुख्य निवडणूक आयुक्तांचा खून करु असे विधान बुलडाणा येथील माजी मंत्री सुबोध सावजी यांनी केले होते. या प्रकरणी सुबोध सावजी यांच्याविरोधात बुलडाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

दरम्यान, सुबोध सावजी यांनी महाविकास आघाडीला ३० ते ३५ जागा मिळतील, अशी आशा व्यक्त केली आहे. याचवेळी बोलताना त्यांनी ईव्हीएम मशिनमध्ये घोळ झाल्यास निवडणूक आयुक्तांचा खून करू असे वादग्रस्त विधान केले. त्यांच्या विधानामुळे आश्र्चर्य व्यक्त होत असून त्यंच्यावर गुन्हाही दाखल झाला आहे.

## बांधकाम मजुराचा मृत्यू; ओळख पटेना

लातूर : प्रतिनिधी- लातूर शहरातील एका बांधकामावर काम करीत असताना चक्कर आली म्हणून त्या बांधकाम मजुरास येथील शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला. त्याचे ऐकीव नाव राकेश रेड्डी रा. मंगलोर (कर्नाटक) असे आहे. पण, अद्याप त्याची पूर्ण ओळख पटली नसून याचाबत कोणास ओळख पटल्यास संबंधीतांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. लातूर शहरातील साईबाबानगर भागात एक काँक्रीटचे काम चालू होते. या कामावर काम करीत असताना राकेश रेड्डी यास चक्कर आली.

तेंव्हा त्यास थोडावेळ बसू दिले व त्यानंतर त्याला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले असता त्याचा त्या दरम्यान मृत्यू झाला असल्याचे सांगण्यात आले. काँक्रीटचे काम करणा-या यासीन मैनोद्दीन पठाण याने त्या बांधकाम मजुरास गोलाई येथून कामासाठी नेले होते. त्याचे नावही त्यास माहीत नव्हते. अधिक चौकशी करत असताना दुस-याच कोणातरी ठेकेदाराने त्याचे नाव राकेश रेड्डी असल्याचे सांगितले. मात्र, त्याची दुसरी कोणतीही ओळख नाही. त्याचे जवळचे कोण नातेवाईक आहेत. नेमके त्याचे नाव राकेश रेड्डी आहे की अन्य, त्याचा पत्ता काय याबाचत कसलीही माहिती उपलब्ध झाली नाही.

त्याचे शवविच्छेदन करण्यात आले असून शासकीय रुग्णालयातील शीतगृहात त्याचे प्रेत ठेवण्यात आले आहे. ५ फूट २ इंच उंचीचा, अंगात काळ्या रंगाची पॅन्ट, चॉकलेटी रंगाचे अंडरविअर, कमरेला काळा कडदोरा, शरिराने मजबूत, डोक्यावर काळे केस, गोल चेहरा, सरळ नाक असे वर्णन आहे. त्याची ओळख पटल्यास संबंधीतांनी शिवाजीनगर पोलीस

ठाणे अथवा तपासीक अंमलदार मंगेश मुळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## छत्रपती शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयाचा ९५.१२ टक्के निकाल

धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) - येथील छत्रपती शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी बोर्ड परीक्षेत कला शाखा ९५.१२ टक्के तर विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल लागला असून विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

विज्ञान शाखेमध्ये अनुजा पडवळ ८६.३३ टक्के (प्रथम) तर वीराक्षी रोहीले ८५.१७ टक्के (द्वितीय) व अर्पिता सुरवसे ८४.३३ टक्के (तृतीय) गुण घेऊन यश मिळविले आहे. विज्ञान शाखेतून परीक्षेसाठी १०४ विद्यार्थी बसले होते. यामध्ये २५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. तर कला शाखेतून समीर शेख ८४ (प्रथम), द्वितीय सायली शिंदे ७८.३३ टक्के (द्वितीय) व तृतीय श्रावणी शिंदे ७६.१७ टक्के (तृतीय) गुण मिळवून यश संपादन केले आहे. ८३ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. ७८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था पदाधिकारी, शाळा समुहाच्यावतीने हार्दिक अभिनंदन केले आहे.

## सिंधुदुर्गातील वेंगुर्लेत बोट उलटून दोघांचा बुडून मृत्यू

सिंधुदुर्ग : उजनीच्या पात्रात बोट बुडून एक मोठी दुर्घटना घडली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा बोट दुर्घटना घडली. सिंधुदुर्ग-वेंगुर्ले बंदरातून जाणारी ही बोट उलटली. यामध्ये दोघांचा बुडून मृत्यू झाला असून, दोनजण बेपत्ता झाले आहेत तर यातील तीन खलाशी हे पोहत किना-यावरआल्याने ते सुदैवाने बचावले आहेत. या बोटीत ७ जण होते.

दरम्यान, बोट उलटून दुर्घटना थांबण्याचे नाव घेत नाही. यापूर्वी उजनीच्या पात्रात बोट बुडून दुर्घटना घडली होती. त्यानंतर अहमदनगर जिल्ह्यातील अकोले येथे प्रवरा नदीत तर एसडीआरफच्या पथकाचीच बोट उलटली होती. त्यानंतर आता सिंधुदुर्ग-वेंगुर्ले बंदरातून जाणारी ही बोट उलटली. यामध्ये दोघांचा बुडून मृत्यू झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मागील दोन दिवसांपासून सिंधुदुर्गात वादळी वा-यासह मुसळधार पाऊस पडत आहे. त्याच दरम्यान काल रात्री वेंगुर्ले बंदरात मच्छिमार बोटींना लागणारा बर्फ घेऊन बोट घेऊन जात असताना अचानकपणे ती बोट उलटली. या बोटीमध्ये एकूण सात खलाशी होते. बोट पलटी झाल्यानंतर तीन जणांनी पोहत पोहत किनारपट्टी गाठली मात्र बाकीचे ४ जण मात्र बेपत्ता झाले. यातील २ जणांचे मृतदेह सापडले तर दोघांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. अचानक घडलेल्या या घटनेने संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

रात्री ढगांचा गडगडाट, जोरदार वादळी वा-यामुळे ही बोट भरकटली असावी असा प्राथमिक अंदाज आहे. बेपत्ता असलेल्या खलाशांपैकी एक खलाशी रत्नागिरीतील तर तीन खलाशी मध्य प्रदेशातील असल्याचे समजते. अन्य होड्यांमधून त्या खलाशांना वाचविण्यासाठी शोध कार्य सुरू झाले. महत्त्वाची बाब म्हणजे मागील ३ दिवसांत बोट बुडाल्याची ही तिसरी घटना आहे.

पान १ वरून

### १९७१ मध्ये...

शूटर्स गँग यांचं राज्य सुरु आहे. मुख्यमंत्री भगवंत मान हे फक्त कागदोपत्री मुख्यमंत्री आहेत. बाकी त्यांना पंजाबच्या परिस्थितीशी काही घेणंदेणं नाही. सगळे मंत्री मजा-मस्ती करत आहेत. अशा परिस्थितीत पंजाबचा विकास कसा होईल? सध्याचं पंजाबमधलं भगवंत मान सरकार हे भ्रष्ट सरकार आहे.

### विधानपरिषदेच्या...

पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम

३१ मे ७ जून पर्यंत अर्ज भरणार, १० जून रोजी अर्जाची छाननी, १२ जूनपर्यंत अर्ज माघारी घेता येणार, २६ जून रोजी मतदान होणार , १ जुलै रोजी होणार मतमोजणी, म्हणून पुढे ढकलली निवडणूक दरम्यान, सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या असल्याने १० जून रोजी राज्यातील बहुतांश सर्वच शाळा आणि शिक्षकांना सुट्टी आहे. त्यामुळे मतदानावर त्याचा परिणाम पडू शकतो, असा शिक्षक संघटनांचा दावा होता. त्यामुळे, ही निवडणूक पुढे ढकलण्याची मागणी शिक्षक संघटनांकडून होत होती. निवडणूक आयोगाने शिक्षक संघटनांची ही मागणी मान्य केली आहे. विधान परिषदेच्या दोन शिक्षक आणि दोन पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आल्या होत्या, आता निवडणूक आयोगाने नव्याने विधानपरिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

### पोर्शे कार...

त्याला बाल सुधार गृहात पाठवावे अशी मागणी केली होती. दोन्ही याचिका अमान्य झाल्या होत्या.

वडील आणि पबच्या मालकांवर गुन्हा दाखल करत त्यांना अटक करण्यात आलं. ३०४ च्या प्रकरणात आम्ही याचिका केल्याप्रमाणे बाल हक्क मंडळाने त्याला ५ जूनपर्यंत बाल सुधार गृहात पाठवले आहे. प्रौढ म्हणून खटला चालवण्याच्या निर्णायावर प्रक्रिया सुरु आहे, अशी माहिती पोलिस आयुक्तांनी दिली.

आम्ही सुरुवातीपासूनच हे प्रकरण अत्यंत संवेदनशीलतेने आणि बारकाव्याने तपासत आहोत. मजबूत केस तयार करत आहोत, पुरावे गोळा करत आहोत, कोणी पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला का याचाही तपास करत आहोत. दोन्ही प्रकरणांचा तपसा करत लवकरात लवकर पिडीतांना न्याय आणि आरोपींना शिक्षा होईल याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. दोन्ही प्रकरणात स्पेशल काऊंसिलची नियुक्ती करण्यात आली असून आमच्याकडून कोर्टात ठामपणे बाजू मांडण्यात येईल याचीही तयारी सुरु आहे.

पोलिसांनी सुरुवातीपासूनच कायद्यानुसार कारवाई केली आहे. पोलिसांवर दबाव होता किंवा तपासात दिरंगाई झाली हे म्हणणे बरोबर नाही. सुरुवातीच्या काळात ३०४ का नाही लावला, आरोपीला सुविधा पुरवण्यात आली यावर चौकशी केली. मात्र, यामध्ये कुठलेही तथ्य दिसून आले नाही. साक्षीदाराशी वाईट वागणूक झाली का याचीही तपासणी सुरु आहे, जर हे खरं ठरलं तर कठोर कारवाई केली जाईल. मी नागरिकांना आश्वासन देतो की यावर कठोरात कठोर कारवाई होईल, असंही ते म्हणाले.

### शांतिगिरी महाराज...

महाराजांकडून करण्यात आला आहे. वाराणसीत साधू-महंतांची ते भेट घेणार आहोत. नरेंद्र मोदी हे माझे राजकारणातील आदर्श असल्याने मी त्यांच्या प्रचारासाठी जात असल्याची माहिती शांतिगिरी महाराजांनी दिली आहे. यावेळी पत्रकारांनी तुम्ही भाजपमध्ये प्रवेश करणार आहात का? असे विचारले असता भाजपमध्ये जायचे की नाही हे आम्ही निकालानंतर ठरवू, असे त्यांनी सांगितले.

### ११, १२ वी...

इयत्ता ३ ते ५ च्या वर्गात सध्याच्या तीन-भाषा प्रणालीऐवजी दोन भाषा असतील. पहिली भाषा ही मातृभाषा किंवा राज्यभाषा (मराठी) असू शकते आणि दुसरी भाषा इतर कोणतीही भाषा असू शकते.

### विशाल...

नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी दिली आहे.

नाट्य क्षेत्रात भरीव कार्य करणा-या नाट्यकर्मींचा सन्मान नाट्य परिषदेच्या वतीने दरवर्षी केला जातो.

यानिमित्ताने कलावंतांचा मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. तसेच १०० व्या नाट्य संमेलनानिमित्त घेण्यात आलेला नाट्यकलेचा जागर यातील सर्वोत्कृष्ट पारितोषिकप्राप्त एकांकिका, बालनाट्य, एकपात्री, नाट्यछटा, नाट्यसंगीत पद गायन, नाट्य अभिवाचन कार्यक्रम यानिमित्ताने सादर होणार आहेत. कलावंत व नाट्यरसिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशांत दामले यांनी केले आहे.

### पाणी टंचाई...

राबवून अधिकाधिक गाळ उपसा होईल, यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

माझा जिल्हा, हरित जिल्हा उपक्रमासाठी सूक्ष्म नियोजन करावे

येत्या पावसाळ्यात जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त वृक्ष लागवड आणि संवर्धन करण्यासाठी ङ्गमाझा जिल्हा, हरित जिल्हाफ उपक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक तालुकास्तरावर सूक्ष्म नियोजन करून वृक्ष लागवडीसाठी स्थळ निश्चिती, रोपांची निवड करावी. शिक्षण विभागानेही यामध्ये पुढाकार घेवून शाळानिहाय वृक्ष लागवडीचे नियोजन तयार करावे. गाळ उपसा करण्यात येणाऱ्या प्रत्येक सिंचन प्रकल्पाच्या परिसरात संबंधित विभाग, स्वयंसेवी संस्थांनी वृक्षारोपण करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. तसेच प्रत्येक तालुक्यात टेकडी, डोंगर परिसरात वृक्षारोपण करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, असे त्यांनी सांगितले.

विहीर पुनर्भरण, रुफ टॉप रेन वॉटर हार्वे स्टिंगसाठी विशेष प्रयत्न करावेत

आगामी काळात पाणी टंचाईची समस्या दूर करण्यासाठी भूजल पुनर्भरणासाठी विविध उपक्रम राबविणे आवश्यक आहे. विशेषतः विहीर पुनर्भरण, रुफ टॉप रेन वॉटर हार्वे स्टिंगच्या माध्यमातून शहरी आणि ग्रामीण भागातही भूजल पुनर्भरणासाठी क्लस्टर स्वरुपात मोहीम हाती घेणे गरजेचे आहे. कृषि विभागाने प्रत्येक तालुक्यामध्ये विहीर पुनर्भरण उपक्रमासाठी व्यापक स्वरुपात कामे हाती घ्यावीत. या कामांचा दर आठवड्याला आढावा घेवून त्याबाबत अवगत करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

जल जीवन मिशनच्या कामांना गती देण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे

जिल्ह्यात जल जीवन मिशनची काही कामे संथगतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे. या कामांना गती देण्यासाठी संबंधित तालुकास्तरीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. या कामांमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या किंवा कामांमध्ये दिरंगाई करणाऱ्याविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. तसेच जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांच्या विहिरींवर सोलर पंप बसविण्याच्या अनुषंगाने नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले.

### जाहीरनामा

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी रेणापुर यांचे कार्यालय**

**(दंडनीय विभाग)**

**जन्म दिनांक प्रमाणपत्र जाहीरनामा**

**जा. क्र. २०२४ / दंडनीय/कावि**

**विषय :-** जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३(३) अन्वये जन्म नोंदणी आदेश होणे बाबत.

**जाहीर प्रगटन**

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार चंद्रकांत रावसाहेब घोलप रा. पोहरेगाव ता. रेणापुर जि. लातूर यांनी या न्यायालयात अर्ज देवून अर्जदार यांची मुले कु. रुद्राक्ष चंद्रकांत घोलप याचा जन्म दिनांक ०४/०८/२००७, कु. ऋषिकेश चंद्रकांत घोलप याचा जन्म दिनांक २७/०८/२००८, संस्कार चंद्रकांत घोलप याचा जन्म दिनांक २६/०४/२०११ रोजी मौ. पोहरेगाव ता. रेणापुर येथे अर्जदार यांचे राहत्या घरी झाला असल्याने जन्म तारखेची नोंदणी ग्रामपंचायत कार्यालय पोहरेगाव येथे करणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी, सदर जन्म/ मृत्यू तारखेच्या नोंदणीसाठी कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आक्षेप सादर करावा. सादर कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप अथवा हरकत सादर न झाल्यास हे न्यायालय अर्जामध्ये योग्य तो आदेश पारित करील मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही.

सदरचे जाहीर प्रगटन हे आज दिनांक २२/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी दिले. पुढील तारीख दिनांक २३/०६/२०२४

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी रेणापुर यांचे कार्यालय**

### जाहीरनामा

**रेणापुर येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात**

कोर्टाचा शिक्का

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ११७/२०२४**

**रामकिसन व इतर २ वि. निरंक**

**निशाणी क.**

**वारसाचे प्रमाणपत्राबाबत**

ज्यापेक्षा लिंबाबाई रामकिसन सिरसाट, रा. फावडेवाडी ता. रेणापूर जि. लातूर हे दि. १६/०४/२०१८ रोजी फावडेवाडी ता. रेणापूर जि. लातूर येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार रामकिसन पिता भिमराव सिरसाट, रा. फावडेवाडी ता. रेणापूर जि. लातूर हयांनी या कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार

१. रामकिसन पिता भिमराव सिरसाट, वय ६५ वर्षे, धंदा शेती,

२. संतोष पिता रामकिसन सिरसाट, वय ३९ वर्षे, धंदा-शेती, दोघे र. फावडेवाडी ता. रेणापूर जि. लातूर

३. सुनीता भ्र. ज्ञानोबा फड, वय ४२ वर्षे, धंदा-शेती, रा. टोकवाडी ता. परळी जि. बीड,अर्जदार-यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू लिंबाबाई रामकिसन सिरसाट, चे वारस सर्टिफिकेट देईल.

पुढील तारीखः २०/०६/२०२४

तारीखः २०/०५/२०२४

**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर रेणापुर**

**क. लिपिक दि.न्या.क.स्तर, रेणापूर**

### जाहीरनामा

**रेणापुर येथील सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात**

कोर्टाचा शिक्का

**किरकोळ दि. अर्ज क. ११६/२०२४**

**वामन/-**

**निशाणी क. ७**

**वारसाचे प्रमाणपत्राबाबत**

ज्यापेक्षा धोंडीराम रामजी राठोड, राहणार रा. कोळगाव ता. रेणापूर जि. लातूर हे ताः ०६/०४/२०२० रोजी किंवा त्या सुमारास मौ. कोळगाव ता. रेणापूर जि. लातूर येथे मयत झाले आणि पुढील अर्जदारानी हया कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील प्रमाणे

अर्जदार -

१ वामन धोंडीराम राठोड, वय -३३ वर्षे धंदा-शेती

२ कृष्णा धोंडीराम राठोड, वय २५ वर्षे बंदा शेती दोघे रा. कोळगाव ता. रेणापूर जि. लातूर ३. सागरबाई परमेश्वर चव्हाण, वय ४५ वर्षे धंदा घरकाम रा पानचिचोली ता. निलंगा जि. लातूर ४. शोमा प्रमोद पवार, वय ३७ वर्षे धंदा घरकाम रा. कानडी बोरगाव ता. जि. लातूर ५ सुमन मधुकर चव्हाण, वय- ३२ वर्षे धंदा- घरकाम रा. समसापुर तांडा ता. रेणापूर जि. लातूर यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अजृदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत धोंडीराम रामजी राठोड वारस असल्याबद्दल वारसा प्रमाणपत्र देईल.

पुढील तारीख ०२.०७.२०२४, तारीख १७ माहे ०५ सन २०२४

**क.लिपीक सह दिन्या क स्तर रेणापूर**

**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर, रेणापूर**


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**

स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69 98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगलः९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ४-७ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगलः०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)


| उदय-अस्त | | सिंगलः७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.



यशवंत
शनिवार दि. २५ मे २०२४
उदगीर
पान ८
कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com

बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग

# आर्य कन्या वैदिक संस्कार शिबिराचा समारोप



उदगीर : भारतीय संस्कृती, सभ्यता, संस्कार आणि शारीरिक सामर्थ्य याबाबत मार्गदर्शन शिबिर हि आजच्या काळाची गरज आहे असे मत इंदिरा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप गायकवाड यांनी व्यक्त केले. आर्य समाज उदगीरतर्फे कॅप्टन डॉ. भारती जाधव यांच्या स्मरणार्थ आयोजित आर्य कन्या वैदिक संस्कार शिबिर छत्रपती शाहुमहाराज सैनिक स्कुल येथे संपन्न झाले या शिबिराचा समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी अध्यक्ष स्थानी मा बसवराज पाटिल नागराळकर यांच्या कन्या सौ ऐश्वर्या पाटील होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून ईदिराबाई चॅरिटेबल ट्रष्टचे अध्यक्ष दिलीप हे होते.

प्रमुख पाहुणे दिलिप गायकवाड म्हणाले की, छत्रपती शाहु सैनिक विद्यालयाच्या निसर्गरम्य ठिकाणी मुलींसाठीचे आर्य कन्या वैदिक संस्कार शिबिराचे आयोजकांचे अभिनंदन करुन शिबिरासाठी प्रतिवर्षी एक लाखप्रमाणे पुढील पाच वर्षांसाठी पाच लाख रुपयाची देणगी जाहीर केली. विकसित भारत, विश्वगुरू भारत, सुपर पॉवर भारत हे नुसत बोलून चालणार नाही तर कृतीही महत्त्वाची असते, करणी आणि कथनी जर एक असेल तर निश्चितपणे येणाऱ्या काही वर्षांमध्ये आपला देश विकसित भारत, विश्वगुरू भारत झाल्याशिवाय राहणार नाही असे गायकवाड यांनी सांगितले शिबिरात वय वर्ष १२ ते २० या वयोगटातील दीडशे मुलींनी भाग घेतला.

या शिबिरामध्ये मुलींचे बौद्धिक ज्ञान वाढवण्या साठी तज्ञांनी मार्गदर्शन केले. शारीरिक सामर्थ्य वाढवण्यासाठी लाठी चालवणे, भाला चालवणे, घोडेस्वारी करणे, बंदूक चालवणे, कराटे, योगा सूर्यनमस्कार प्रशिक्षण व वैदिक ज्ञान , श्रेष्ठ जीवन पद्धति , कैरियर मार्गदर्शन करण्यात आले.

आर्य कन्या वैदिक संस्कार शिबिरामध्ये विद्यार्थिनींना मार्गदर्शन केलेले वक्ता प्रकाश कच्छवा ,सोमदेव शिंदे, लीलावती जगदाळे, डॉ. प्रियंका राठोड, अनंत चमपाई कदम, दयानंद शास्त्री, स्वामी विद्यानंद जी, मीना हुरदळे ,श्रीराम चामले, संजय पाटील, एडवोकेट अश्विनी कुलकर्णी, मुरलीधर जाधव, चंद्रकांत वेदालंकार ,सुधीर गायकवाड, डॉ. नयन कुमार आचार्य ,अभिलाषा आर्य, तानाजी शास्त्री, सुरेखा गुजलवार ,इंदुमती सुतार, उत्तमराव दंडीमे, लक्ष्मणराव हुलगुंडे, वेद सिंधुजी, अखिलेश शर्मा, व्यंकटेश हालिंगे, नितेश कुमार आर्य, राजेंद्र दिवे आदीनी मार्गदर्शन केले.

विविध कलागुण सादर केलेल्या मुलीना पुरस्कार व प्रमाणपत्र प्रःमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. सौ सुमनताई कंधारे यानी आपली बहिन स्व कैप्टन भारती जाधव यांच्या स्मरणार्थ दरवर्षी शिबिरासाठी ५० हजार रुपये दान देण्याची घोषणा केली.

शिबीर यशस्वी करण्यासाठी अर्जुनराव सोमवंशी, सुबोध आंबेसंगे, डॉ. नरेश शिंदे, व्यंकटेश हालिंगे, सावंत टंकसाळे, भाऊराव अहमदाबादे , बलराज कंधारे, सतीश मगदाले, सौ कुमुद अंबेसंगे, सौ अनिता कंधारे ,श्रीमती भगवती टवानी सौ. मगदाळे यानी परिश्रम घेतले.

# कै.विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियन स्पर्धा संपन्न



उदगीर/प्रतिनीधी : लातूर ग्रामीणचे आमदार धीरज भैया देशमुख यांनी लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन करून, पहिल्यांदा तालुका पातळीवर स्पर्धा घेण्यात आल्या.

उदगीर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष कल्याण पाटील, उदगीर कृषी तून बाजार समितीचे सभापती शिवाजी अण्णा हुडे, संचालक संतोष बिरादार, पद्माकर उगिले, काँग्रेस पक्षाच्या प्रदेश सचिव उषाताई कांबळे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष शीलाताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उदगीर तालुका क्रीडा स्पर्धांचे नियोजन युवा मित्रांच्या सहकार्याने यशस्वी करण्यात आपल्याला चांगले यश आले.

या स्पर्धांसाठी उदगीर तालुक्यातील काँग्रेस प्रेमींनी उत्स्फ़ूर्तपणे सहकार्य केले. ग्रामीण भागातील संघही मोठ्या प्रमाणात आम्ही आवाहन केल्यानंतर लगेचच सहभागी झाले. निसर्गाने ही या काळात आम्हाला साथ दिली. आमचे मनोबल वाढवले.

# तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन



देवणी/प्रतिनिधी :
देवणी तालुक्यातील देवणी खुर्द येथे बौद्ध समाज मंदिर येथे तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन देवणी पोलीस स्टेशनचे पीआय माणिकराव डोके यांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी डोके यांचा सत्कार तुकाराम पाटील देवणीकर यांनी केले व बिट जमादार विनायक कांबळे यांचा सत्कार रमेश कांबळे यांनी केले व शेख शौकत यांचा सत्कार ग्रामपंचायत सदस्य माधव रणदिवे, यांनी केले यावेळी माजी पोलीस पाटील तुकाराम देवणीकर,सरपंच यशवंत कांबळे, निवृत्ती कांबळे, रमेश कांबळे,अनिल कांबळे,मनोहर पाटील, शंकर पाटील,तातेराव उगीले, राजू गरड,राम धनासुरे, प्रभू काकनाळे, प्रा,नरसिंग सूर्यवंशी आनंदवाडीकर दिलीप शिंदे,व्यंकट कांबळे, ज्ञानोबा कांबळे, सूर्यकांत कांबळे, विजयकुमार सूर्यवंशी, प्रशांत कांबळे,जीवन कांबळे, किरण कांबळे,मधुकर कांबळे, माझी सरपंच चंद्रकला कांबळे,दैवशाला कांबळे, विश्रांती बोरसुरीकर, सुप्रिया कांबळे पत्रकार भैय्यासाहेब देवणीकर आदी उपस्थितीत होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल कांबळे व आभार विजयकुमार सूर्यवंशी यांचे मानले

००००

# १२ वी बोर्ड परीक्षेत विवेक वर्धीनी उच्च माध्यमिक विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

देवणी/प्रतिनिधी :
देवणी येथील विवेक वर्धिनी उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्तुंग भरारी घेऊन दैदिप्यमान यश प्राप्त केले आहे बारावी विज्ञान शाखेचा निकाल ९९.३०%*कला शाखेचा निकाल ८१.३८%

वाणिज्य शाखेचा निकाल१००% लागला असून कला शाखेत एकुण १८८ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली होती.त्यापैकी १५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.विशैष प्राविण्यासह ०४ विद्यार्थी उत्तीर्ण,प्रथम श्रैणीत ८२ विद्यार्थी उत्तीर्ण तर ६५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत आणि २ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

१. फुलमंटे विष्णू गंगाधर=७७.००%
२. कांबळे अंकिता उमाकांत=७६.५०%
३. चोले वैशाली माधव=७६.३३%

विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थी विज्ञान शाखेत एकुण ४३१ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली होती त्यापैकी ४२८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.त्यामधे २४२ विद्यार्थी विशैष प्राविण्यासह,१७५ विद्यार्थी प्रथम श्रैणीत,६५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले व ०१ विध्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले

१.सय्यद मिसिरा खालिद=९४.६७%
२.बिरादार मधुर बालाजी=९३.३३%
३.जाधव केशव विष्णू=९१.५०%


वाणिज्य शाखेचे निकाल
वाणिज्य शाखेत एकूण ६७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती.त्या पैकी सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, १००% निकाल आहे.
विशेष प्रविण्यासह ३६ विद्यार्थी उत्तीर्ण,प्रथम श्रेणीत २९ विद्यार्थी उत्तीर्ण तर द्वितीय श्रेणीत ०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

१. पाटील प्रिया सुनील=९०.८३%
२. नागुरे पल्लवी रमेश=८६.१७%
३. सय्यद कशिश अहमदमियां=८५.३३%

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक,लोकजागृती शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष श्र्यंकटराव पाटील वलांडीकर ,सचिव भगवानरावपाटीलतळेगावकर,उपाध्यक्ष अण्णाराव पाटील ,सह सचिव नागोराव भोसले , कोषाध्यक्ष शंकरराव पाटील तळेगावकर,तळेगाव सरपंच सदाशिवराव पाटील तळेगावकर, पोलिस पाटील संभाजीराव पाटील साहेब तळेगावकर, कर्मचारी पथ संस्थेचे चेअरमन तानाजीराव पाटील तळेगावकर, प्राचार्य /मुख्याध्यापक राजे डी.व्हीं ,उप प्राचार्य पाटील बी व्हीं व सर्व प्राध्यापक,प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे. तसेच त्यांच्या पूढील वाटचालीस शूभेच्छा दिल्या.

००००

# जय हिंद पब्लिक स्कूल मधील दहावीच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा ठेवली कायम





उदगीर:- येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जय हिंद पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचा सीबीएसई बोर्डद्वारे २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल लागला असून शाळेतील दहावीचा ९८% टक्के निकाल लागत विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम ठेवली आहे.या परीक्षेत दहावीतील एकूण १००विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यात सुरनार मेघाश्री-९५.४०%, हाश्मी नुरीन - ८७.६०%, जागीरदार अब्बु बकार-८७.२०%, पाटील प्राची-८६.४०%, शेख कमरान-८४.६०%, हे विद्यार्थी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाले आहेत तर इतर २०विद्यार्थ्यांनी प्रविण्या सह यश संपादन केले आहे.

दहावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. सुधीर जगताप,स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या व्यवस्थापिका ज्योती स्वामी, जय हिंद पब्लिक स्कूलचे प्राचार्य संजय हट्टे, उपप्राचार्य सतीश वाघमारे, न्याबेट समन्वयक मनोरमा शास्त्री, पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा.राहुल पूंडगे यांच्या सह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



श्री महात्मा बसेश्वर सार्वजनिक वाचनालय हेर तालुका उदगीर येथे दिनांक १०/५/२०३४ रोजी या वाचनालयामध्ये महात्मा बसेश्वर याची जयंती साजरी करण्यात आली.
वाचनालयाच्या ग्रंथपाल मेदगे विजय मला प्रकाश यांनी दीपप्रज्वलन करून प्रतिमेचे पूजन केले. यावेळी वाचनालयाचे सचिव कडोळे शिवलिंग तसेच गावातील दिनकर पांचाळ, भुजंगाप्पा आग्रे,संगमेश्वर खराबे, सार्थक कडोळे, प्रीती मेदगे, स्वरा मेदगे, अथर्व मेदगे इत्यादी उपस्थित होते.

# आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचा १००% निकाल




देवणी :- देवणी येथील आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्याने कडउ बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट काम गिरी केली आहे. शाळेचा १००% निकाल लागला आहे.

विद्यालयातून सलाउद्दीन मचकुरी याने ७८% मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे तर भंडे प्रज्वल या विद्यार्थ्याने ७५.६७% मिळवून द्वितीय क्रमांक तर आदित्य भोसले याने ७३.३३% मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान भोपनी चे अध्यक्ष मा.श्री गोविंदरावजी भोपणीकर साहेब, संस्था सचिव गजानन भोपणीकर, शाळेचे प्राचार्य, उपप्राचार्य आणि शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

००००

# डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराजांचा पौरहित्य मंडळाच्या वतीने सत्कार



उदगीर/प्रतिनिधी :
श्री गुरु हावगीस्वामी मंदिर सुवर्ण कळसारोहण अभुतपुर्व सोहळ्याचे यशस्वी आयोजन केल्या बद्दल सर्व पौरहित्य मंडळाच्या वतीने श्री गुरु हावगीस्वामी मठाचे मठाधिश डॉ.शंभूलिंग शिवाचार्य महाराजांचा काशीपीठाचे जगदगुरु डॉचंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या उपस्थितित सत्कार करुन आशिर्वाद घेतला.

यावेळी विरभद्र स्वामी, सौ वैशाली स्वामी, यांच्या हस्ते डॉ. ष.ब्र.१०८ डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांचा पुष्पमाला अर्पण करून सत्कार करण्यात आला व आशिर्वाद घेतला. यावेळी रामलिंग स्वामी नागलगावकर, सुनील स्वामी वाडवणकर, बाबु स्वामी लोणीकर, शिवराजआप्पा स्वामी हाळीकर, अजय स्वामी हाळीकर, संदीप स्वामी आटोळा, शंकर स्वामी लोहारा, विशाल स्वामी उदगीर, शिवसांब स्वामी उदगीर, हावगीप्रसाद स्वामी उदगीर, आदी उपस्थितीत होते.
या प्रसंगी क्रिडा मंत्री ना. संजय बनसोडे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, महादेव शिवाचार्य महाराज वाईकर,शंभुलिंग शिवाचार्य महाराज अंबाजोगाई,सिध्दलिंग महास्वामी देवणी,म.नि.प्र.शिवानंद महास्वामी सायगावकर , सिध्दओमकार शिवाचार्य जंगम वाडी,मुरुगेंद्र स्वामी आदी उपस्थित होते.

# तीर्थ वाडी येथे खरीप हंगाम पूर्व बैठक संपन्न



मौजे तिर्थवाडी ता.चाकुर येथे खरीप हंगाम पूर्व बैठक आयोजित करण्यात आली.
या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून श्री.चामले (कृ.स.चाकुर), यांची उपस्थित होते
सदरील बैठकीमध्ये खरिप हंगाम पुर्व तयारी च्या अनुषंगाने प्रास्ताविक गावचे उपसरपंच राजकुमार शेटे साहेब यांनी केले. तर सोयाबीन लागवड तंत्रज्ञान (बियाणे उगवण क्षमता तपासणी,बिजप्रक्रिया, बीबीएफ व टोकण पद्धतीने लागवड, योग्य वाण निवड,खत व्यवस्थापन, एकात्मिक किड व रोग नियंत्रण, शंखी गोगलगाय व्यवस्थापन )व तुर पिकातील मर रोग व्यवस्थापन इ. बाबत मार्गदर्शन श्री. चामले कृषी सहाय्यक यांनी केल. सुदर्शन बोराडे तंत्रज्ञान समन्वय पोखरा यांनी रुंद सरी बरंबा पद्धत व शुन्य मशागत तंत्रज्ञाना संदर्भात मार्गदर्शन केले. व सर्व शेतकऱ्यांना यावर्षी रुंद सरी वरंबा पद्धत( बेड)वरती सोयाबीन या पिकाची लागवड करावी असे आवाहन केले. मनोज बिराजदर व महाडीबीटी पोर्टल वर बियाण्या करीता ऑनलाईन अर्ज करणे,वैयक्तिक शेततळे,फळबाग, कांदाचाळ व शेडनेट आणि महाडीबीटी वरील अनु.जाती व अनु. जमाती या संवर्गातील शेतकऱ्यांचे अर्जसंख्या वाढविणे यासंदर्भात मनोज बिराजदर यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन कले.

या कार्यक्रमास गावातील उप सरपंच राजकुमार शेटे व कृषी मित्र रामेश्वर पताले व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

०००००

## टीसी हरवली आहे

माझी जीवने सागर नागनाथ या नावाची बारावी पासची टीसी दिनांक २५/७/२०२२ उदगीर ते देवणी बस प्रवासात हरवली आहे. जर कोणाला सापडल्यास संपर्क साधावा.
संपर्क
मो.नं.९९२३८३०५१२

## टीसी हरवली आहे

माझी शुभम इरवंत भंडरवार या नावाची बारावी पासची टीसी दि.१५/५/२०२४ येणकी माणकीरोड ते शक्ती निवास दरम्यान प्रवासात हरवली आहे. सापडल्यास संपर्क साधावा.
संपर्क
मो.नं.९८९०७५३५२३

# बालीकाबाई पाटील यांचे निधन



देवणी : दवणहिप्परगा ता.देवणी येथील बालीकाबाई गुणवंतराव पाटील वय६५ यांचे गुरूवार दि.२३ रोजी दु. बारा वा. निधन झाले.त्यांच्यावर दवणहिप्परगा येथील त्यांच्या शेतात सायंकाळी साडेपाच वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, मुलगी, सूना नातवंडे असा परिवार असून दवणहिप्परगातील ग्रामीण डाक सेवक तथा माजी सैनिक गुणवंतराव पाटील यांच्या त्या पत्नी होते.